रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १९ ◆ अंक ५
www.ramprahar.com
◆ बुधवार, २२ जुलै २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग

शिलालेखाने उलगडला शैव परंपरेचा इतिहास/२
कोशिंबळे धबधब्यात बुडून स्थानिकाचा मृत्यू/५
कुस्तीमहर्षी रायगड केसरी स्पर्धा उत्साहात/८

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांचा वाढदिवस होणार 'सेवाभावी'



**मुंबई :** राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा बुधवारी (दि.२२) वाढदिवस आहे. त्याचे औचित्य साधून भाजपच्या वतीने राज्यभरात व्यापक सामाजिक उपक्रम आणि सेवा सप्ताह आयोजित करण्यात आला आहे. २२ जुलै ते ५ ऑगस्ट या कालावधीत शासकीय व पक्ष पातळीवर राजस्व अभियान राबवले जाणार आहे. यामध्ये मुख्यमंत्री बळीराजा शेत पाणंद रस्ते योजना, सातबाऱ्यावर नाव नोंदणी व दुरुस्ती, सातबारा फोड करणे तसेच दिव्यांग, युवक व शेतकरी महिलांच्या अडचणी सोडवण्यासाठी विशेष शिबिरांचे आयोजन केले जाईल. याशिवाय १९ ते २३ जुलैदरम्यान राज्यभरात महारक्तदान अभियान राबवून सुमारे एक लाख रक्तदात्यांचे योगदान मिळवण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. महिला शेतकऱ्यांना कायदेशीर दर्जा देणारे विधेयक संमत केल्याबद्दल भाजप महिला मोर्चाच्या वतीने संघटनात्मक ७२ विभागांमध्ये देवाभाऊ कृषी माऊली सोहळा होणार आहे.

# शेतकरी कर्जमाफीची पहिली यादी आज

## मुख्यमंत्र्यांची माहिती; बळीराजाला मिळणार दिलासा

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यातील बळीराजाला कर्जाच्या विळख्यातून मुक्त करण्यासाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेंतर्गत पात्र शेतकऱ्यांची पहिली यादी दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या जयंतीचे औचित्य साधून २२ जुलै रोजी जाहीर करण्याचा प्रयत्न आहे, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी (दि.२१) दिली.

मुंबईत माध्यमांशी संवाद साधताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, सहकारमंत्री बाबासाहेब पाटील आणि त्यांचा विभाग प्रक्रियेची तयारी पूर्ण करीत आहे. अजितदादांच्या जयंतीनिमित्त शेतकरी कर्जमाफीची पहिली यादी जाहीर करण्याचा सरकारचा पूर्ण प्रयत्न राहील.



कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी सांगितले की, कर्जमाफीच्या प्रक्रियेतील सर्व तांत्रिक अडचणी आता दूर झाल्या असून आयकर डेटासंदर्भातील माहितीही प्रशासनाला प्राप्त झाली आहे. त्यामुळे अजितदादांची जयंती आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून प्राथमिक यादी प्रसिद्ध केली जाईल. त्याचप्रमाणे राज्यात बोगस बियाणे विक्रीप्रकरणी ११ हजार ५८४ तक्रारींच्या आधारे कारवाईचा धडाका सुरू असून आतापर्यंत ८१ कंपन्यांवर गुन्हे दाखल करण्यात आल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

महायुती सरकारने यापूर्वीच पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेतील जाचक अटी रद्द करून ३६ लाख अतिरिक्त शेतकऱ्यांना दिलासा दिला आहे. या योजनेंतर्गत एकूण ५६ लाख शेतकऱ्यांना ३६ हजार ५८५ कोटी रुपयांचा लाभ दिला जाणार आहे. सन २०१९च्या कर्जमाफीतील लाभार्थ्यांसाठी असलेली ५० हजारांची मर्यादा रद्द करून ती दोन लाखांपर्यंत वाढवण्यात आली आहे, तर नियमित कर्ज परतफेड करणाऱ्या सुमारे २३ लाख शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर लाभ देण्यासाठी नवीन कर्जाची उचल करण्याची अटही रद्द करण्यात आली आहे.

### 'दिल्लीतील आंदोलनात बाहेरचे लोक घुसलेत'

कॉक्रोच जनता पक्ष आणि सामाजिक कार्यकर्ते सोनम वांकचूक यांनी सुरू केलेल्या आंदोलनात अनेक राजकीय मंडळी आणि संघटना आपल्या स्वार्थापोटी घुसल्याचा आरोप मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी केला. लोकशाहीमध्ये आंदोलन करण्याचा अधिकार सर्वांना आहे. कोणी परवानगी घेऊन, शांतीपूर्ण आंदोलन करत असेल तर अशा आंदोलनाला परवानगी दिली जाईल, मात्र जाणीवपूर्वक राजकीय अशांतता तयार करण्याकरिता विनापरवानगी आंदोलन करणे, हिंसा करणे हे मात्र कुठल्याही परिस्थितीमध्ये योग्य नाही, असेही मुख्यमंत्री म्हणाले.

# पेपरफुटी प्रकरणात कोणालाही पाठीशी घातले जाणार नाही -पंतप्रधान मोदी

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

एनडीएच्या मंगळवारी (दि.२१) झालेल्या बैठकीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी वैद्यकीय प्रवेश परीक्षा 'नीट'मधील पेपरफुटी प्रकरणावर आक्रमक भूमिका मांडली. विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळणारे हे पाप करणाऱ्यांना कठोर शिक्षा झालीच पाहिजे, असा इशारा देत पंतप्रधानांनी या प्रकरणात कोणालाही पाठीशी घातले जाणार नसल्याचे स्पष्ट केले आहे.

भविष्यकाळात देशात अशा प्रकारच्या पेपरफुटीच्या घटनांची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी केंद्र सरकारने परीक्षा यंत्रणेत अमूल्य बदल करत कठोर पावले उचलली असल्याचेही त्यांनी नमूद केले.



पंतप्रधान मोदी म्हणाले, जेव्हा पेपरफुटीची घटना उघडकीस आली, तेव्हा सरकारने तत्काळ कठोर पावले उचलली. या प्रकरणात १३ जणांना अटक करून त्यांची तुरुंगात रवानगी करण्यात आली. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान किंवा भविष्य धोक्यात येऊ नये यासाठी फेरपरीक्षा घेण्यात आली. ही फेरपरीक्षा अत्यंत यशस्वीरित्या पार पडली असून तिचे निकालही जाहीर करण्यात आले आहेत.

पेपरफुटीच्या मुद्द्यावर बोलताना पंतप्रधान मोदी म्हणाले की, हा विषय केवळ केंद्र सरकार किंवा राज्य सरकारपुरता मर्यादित नाही तसेच हा पक्षीय राजकारणाचा विषय नसून देशातील लाखो विद्यार्थ्यांच्या भविष्याशी जोडलेला संवेदनशील प्रश्न आहे. त्यामुळे प्रणाली अभेद्य बनवण्यासाठी सर्वांनी एकत्र येऊन काम केले पाहिजे. या प्रकरणात दोषींना कायदेशीर चौकटीत कठोर शिक्षा देण्यासाठी ज्येष्ठ वकिलांनीही सहकार्य करावे. विरोधी पक्षांनाही मतभेद बाजूला ठेवून देशाच्या आणि विद्यार्थ्यांच्या हितासाठी एकत्र काम करण्याचे आवाहन पंतप्रधानांनी यावेळी केले.

# मच्छीमारांच्या प्रश्नांसंदर्भात मंत्री नितेश राणे यांच्यासोबत महत्त्वपूर्ण बैठक

**मुंबई : रामप्रहर वृत्त**

मत्स्यव्यवसाय क्षेत्रातील विविध प्रश्न, अडचणी आणि प्रलंबित मागण्यांबाबत राज्याचे मत्स्य व बंदरे विकासमंत्री नितेश राणे यांच्यासोबत भाजपचे महाराष्ट्र प्रदेश चिटणीस आमदार प्रशांत ठाकूर आणि आमदार महेश बालदी यांच्या पुढाकारातून महत्त्वपूर्ण बैठक पार पडली.

मुंबईत झालेल्या या बैठकीस आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी यांच्यासह रायगड जिल्हा परिषद अध्यक्ष मंगेश वाकडीकर उपस्थित होते.



बैठकीत मच्छीमार बांधवांना भेडसावणाऱ्या विविध समस्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. विशेषतः डिझेल अनुदानात वाढ करणे, मच्छीमारांसाठी विशेष विमा योजना अधिक प्रभावीपणे राबविणे, आधुनिक जेट्टी व कोल्ड स्टोरेज सुविधा उभारणे, बेकायदेशीर मासेमारीवर कठोर कारवाई करणे, नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या नुकसानीची तातडीने भरपाई देणे तसेच मत्स्यव्यवसायाला पूरक उद्योगांना चालना देण्यासाठी आवश्यक उपाययोजना राबविण्याबाबत सकारात्मक विचारविनिमय करण्यात आला.

यावेळी उपस्थित लोकप्रतिनिधींनी रायगडसह किनारपट्टी भागातील मच्छीमारांच्या अडचणी मंत्री नितेश राणे यांच्या निदर्शनास आणून देत त्यांच्या न्याय्य मागण्यांवर तातडीने निर्णय घेण्याची मागणी केली. मंत्री राणे यांनी मच्छीमारांच्या हिताला शासनाचे सर्वोच्च प्राधान्य असल्याचे स्पष्ट करत बैठकीत मांडण्यात आलेल्या सर्व मागण्यांवर सकारात्मक विचार करून शासन स्तरावर आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल, असे आश्वासन दिले.

या बैठकीमुळे मत्स्यव्यवसाय क्षेत्रातील विविध प्रलंबित प्रश्न सोडविण्यास गती मिळणार असून मच्छीमारांच्या आर्थिक व सामाजिक सक्षमीकरणासाठी महत्त्वपूर्ण पाऊल पडणार आहे.



**मुंबई :** महाराष्ट्र मुख्यमंत्री कार्यालयातील अतिरिक्त मुख्य सचिव लोकेश चंद्रा यांची सदिच्छा भेट घेण्यात आली. यावेळी मंत्री भरत गोगावले, भाजपचे प्रदेश चिटणीस आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, आमदार महेंद्र दळवी, रायगड जिल्हा परिषदेचे अध्यक्ष मंगेश वाकडीकर आदी मान्यवर उपस्थित होते.






# छायाचित्र प्रदर्शनातून उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांच्या जीवनप्रवासाचे दर्शन –मुख्यमंत्री



**मुंबई : प्रतिनिधी**

उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांच्यावर आधारित छायाचित्र प्रदर्शनाच्या माध्यमातून दादांचा संपूर्ण जीवनप्रवास सुंदरपणे उलगडला गेला आहे. त्यांच्या कार्यकर्तृत्वाची आणि अष्टपैलू व्यक्तिमत्त्वाची झलक यातून पाहायला मिळते. या छायाचित्र प्रदर्शनातून त्यांच्या संपूर्ण जीवनपटाचे दर्शन होत असून आपल्या सर्वांच्या मनात त्यांच्या स्मृती कायम राहतील अशी भावना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केली.

उपमुख्यमंत्री स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या ६७ व्या जयंतीचे औचित्य साधून महिला आर्थिक विकास महामंडळाच्या सभागृहात त्यांच्या जीवनप्रवासावर आधारित 'अजित स्मृती अविट स्मृती' या विशेष छायाचित्र प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते या प्रदर्शनाचे आज उद्घाटन झाले. प्रदर्शनाचे उद्घाटन केल्यानंतर प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अजित दादांच्या आठवणींना उजाळा दिला.

उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर, सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. या प्रदर्शनामुळे दादांच्या आठवणी पुन्हा एकदा ताज्या झाल्या आहेत. अजितदादांवर प्रेम करणाऱ्या आणि त्यांना मानणाऱ्या प्रत्येकाने हे छायाचित्र प्रदर्शन आवर्जून पाहावे, असे आवाहनही मुख्यमंत्र्यांनी यावेळी केले.

आमदार शिवाजीराव गर्जे, सतीश चव्हाण, चंद्रदीप नरके, गोकुळ शिंदे, हिरामण खोसकर, माजी आमदार राजेश पाटील, गोकुळ संघाचे माजी चेअरमन अरुण डोंगरे यांच्यासह लोकप्रतिनिधी आणि मान्यवर यावेळी उपस्थित होते.

## पोलीस, स्थानिक रहिवासी आणि हेल्प फाऊंडेशनमुळे वाचले युवकाचे प्राण

**चौक : प्रतिनिधी**



खालापूर तालुक्यातील मोरबे धरणाच्या वरील अतिशय दुर्गम भागातील आंबेवाडी परिसरात खोल दरीत पडलेल्या वीरा स्वामी या पनवेल येथील राहणाऱ्या युवकाचा पोलीस, स्थानिक रहिवाशी आणि हेल्प फाऊंडेशन यांच्या यशस्वी रेसक्युने जीव वाचला.

वीरा स्वामी वय वर्ष १९ हा आपल्या मित्रांसह खालापूर तालुक्यातील मोरबे धरणाच्या वरील अतिशय दुर्गम भागातील आंबेवाडी परिसरात फिरण्यास आला असता, पाय घसरून खोल दरीत पडला, याची माहिती कुणालाच नाही, तरीही जखमी झालेला वीरा स्वामी ओरडत होता, त्याच्या आवाजाने इतरांच्या लक्षात आले, तो दरीत पडला आहे, या दरीत उतरणे कुणालाही शक्य नव्हते, चौक चे सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप शिंगटे यांना खबर मिळताच त्यांनी त्या ठिकाणी धाव घेतली, जाताना त्यांनी तेथील पोलीस पाटील आणि हेल्प फाऊंडेशन यांना कळविले.

काही वेळातच हेल्प फाऊंडेशन चे गुरुनाथ साठेलकर त्यांची टीम घेऊन पोहचले, अशा परिस्थितीत स्थानिक रहिवाशी यांना परिसराची माहिती असते, याची जाणीव सहायक पोलीस निरीक्षक संदीप शिंगटे आणि हेल्प फाऊंडेशनचे गुरुनाथ साठेलकर यांना होती, तेथील तरुण रहिवाशी यांच्या मदतीने वीरा स्वामी याला अतिशय कठीण प्रसंगातून, पडणाऱ्या धो धो पावसात आणि अंधाराच्या साम्राज्यातून दरीतून वर आणला.

## रामशेठ ठाकूर महाविद्यालयात विद्यार्थ्यांसाठी म्युच्युअल फंड प्रशिक्षण

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात वाणिज्य संघटने तर्फे मंगळवार दिनांक २१ जुलै रोजी टी.वाय.बी. कॉम व एस वाय बॅफच्या विद्यार्थ्यांसाठी "म्युच्युअल फंड : गुंतवणुकीच्या संधी व आर्थिक साक्षरता" या विषयावर विशेष प्रशिक्षण सत्राचे आयोजन करण्यात आले होते.

या प्रशिक्षण सत्रात बीएससी इन्वेस्टर फोरमचे अनुभवी तज्ञ उपस्थित होते.त्यांनी विद्यार्थ्यांना म्युच्युअल फंड म्हणजे काय, त्याचे प्रकार, गुंतवणुकीचे फायदे, जोखीम व्यवस्थापन, एस आय पी दीर्घकालीन आर्थिक नियोजन तसेच योग्य गुंतवणुकीचे महत्त्व याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदवून विविध प्रश्न विचारले. तज्ज्ञांनी त्यांची समाधानकारक उत्तरे देत विद्यार्थ्यांमध्ये आर्थिक साक्षरतेची जाणीव निर्माण केली.हा उपक्रम यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी प्रा. राहुल कांबळे व प्रा. प्रवर शर्मा तसेच दोन्ही विभागातील इतर सर्व प्राध्यापक यांनी कार्यक्रमाचे नियोजन करून तो यशस्वीरीत्या घेण्यात आला. तसेच महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. महेश्वरी झिरपे मॅडम यांनी या उपक्रमासाठी मोलाचे मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सर्व अध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी दिलेल्या मोलाच्या सहकार्याबद्दल त्यांचेही मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यात आले. अशा प्रकारचे उपक्रम विद्यार्थ्यांच्या आर्थिक ज्ञानात भर घालून त्यांना भविष्यात सुजाण गुंतवणूकदार बनण्यासाठी निश्चितच उपयुक्त ठरतील, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील विद्यार्थी शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी उपस्थित राहून सहकार्य केले.

## माणगाव नगरपंचायत हद्दीतील आदिवासीवाडी रस्त्याविना!

**माणगांव : बातमीदार**



माणगाव नगरपंचायत हद्दीतील जुन्या उतेखोल आदिवासी वाडीतील नागरिकांना आजही मूलभूत रस्त्याच्या सुविधेपासून वंचित राहावे लागत असल्याचे वास्तव समोर आले आहे. गावात ये-जा करण्यासाठी नागरिकांना कचरा प्रक्रिया केंद्रालगतच्या मार्गातून वाट काढावी लागत असल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, वनवासी आश्रमशाळेसमोरील कचरा हटविण्यासाठी नगरपंचायतीकडून सुमारे एक कोटी रुपये खर्च करण्यात आल्याचे सांगण्यात आले तिथला कचरा उचलला देखील मात्र, त्यानंतरही नव्याने उभारलेल्या कचरा प्रक्रिया केंद्रात पुन्हा मोठ्या प्रमाणात कचऱ्याचे ढिग साचल्याचे चित्र दिसत आहे. एवढा खर्च करूनही कचरा व्यवस्थापनाचा कायमस्वरूपी प्रश्न सुटला का, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

विशेष म्हणजे, या जुन्या आदिवासी वाडीतील नागरिकांना गावात जाण्यासाठी याच डंपिंग मधील मार्गाचा वापर करावा लागत असल्याचे स्थानिकांनी सांगितले. दुर्गंधी, अस्वच्छता आणि आरोग्याच्या संभाव्य धोक्यांमुळे महिला, ज्येष्ठ नागरिक आणि शालेय विद्यार्थ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असल्याचा दावा ग्रामस्थांनी केला आहे.

नगरपंचायत हद्दीत समाविष्ट असूनही आजपर्यंत पक्का आणि सुरक्षित रस्ता उपलब्ध न झाल्याने नागरिकांनी प्रशासनाकडे तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. या प्रश्नाकडे संबंधित प्रशासनाने गांभीर्याने लक्ष देऊन आदिवासी वाडीसाठी तातडीने स्वतंत्र व सुरक्षित रस्त्याची व्यवस्था करावी, अशी मागणी स्थानिकांकडून करण्यात येत आहे.

# पंचायतराज अभियानांतर्गत पूर्ण कर भरणाऱ्या ग्रामस्थांसाठी तांबाटी ग्रामपंचायतीचा लकी ड्रॉ

**खोपोली : प्रतिनिधी**

मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत पूर्ण कर भरणाऱ्या ग्रामस्थांसाठी तांबाटी ग्रामपंचायतीने लकी ड्रॉचे आयोजन केले होते.या उपक्रमाला ग्रामस्थांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला आणि मोठ्या प्रमाणात कर भरला.कार्यक्रमाला पंचायत समितीचे सभापती कृष्णा पारंगे, उपसभापती भाई शिंदे, शिवसेना तालुकाप्रमुख संदेश पाटील,सरपंच अविनाश आमले आणि ग्रामविकास अधिकारी प्रशांत कदम यांची प्रमुख उपस्थिती होती.

पूर्ण कर भरणाऱ्या नागरिकांमधून चिठ्ठी पद्धतीने विजेत्यांची निवड करण्यात आली.यामध्ये दुचाकी,एलईडी टीव्ही,मिक्सर,इस्त्री,रेडिओ, सिलिंग फॅन अशा आकर्षक बक्षिसांचे वितरण करण्यात आले.राजेश बामणे आणि करुणा म्हात्रे यांनी दुचाकी जिंकली,तर परशुराम हिंदोळे यांना एलईडी टीव्हीचे बक्षीस मिळाले.इतर अनेक ग्रामस्थांनाही विविध घरगुती वस्तूंची बक्षिसे देण्यात आली.

सभापती कृष्णा पारंगे यांनी या उपक्रमाचे कौतुक करत,तांबाटी ग्रामपंचायतीचा हा प्रयोग राज्यातील इतर ग्रामपंचायतींसाठीही प्रेरणादायी ठरेल,असे सांगितले.सरपंच अविनाश आमले यांनी गावाच्या विकासासाठी कर भरणे अत्यंत महत्त्वाचे असल्याचे सांगत,नागरिकांनी दिलेल्या सहकार्यामुळे हा उपक्रम यशस्वी झाल्याचे नमूद केले.

तर ग्रामविकास अधिकारी प्रशांत कदम यांनी सांगितले की, ग्रामस्थांच्या विश्वासामुळे २० लाखांहून अधिक कर वसूल झाला असून,हा निधी गावातील रस्ते,पाणीपुरवठा आणि इतर विकासकामांसाठी वापरण्यात येणार आहे.

कर वसुलीचा प्रश्न सोडवण्यासाठी तांबाटी ग्रामपंचायतीने राबविलेला हा लकी ड्रॉ उपक्रम सध्या सर्वत्र चर्चेचा विषय ठरत आहे. लोकसहभागातून विकासाचा आदर्श निर्माण करणारा हा प्रयोग इतर ग्रामपंचायतींसाठीही मार्गदर्शक ठरणार का? हे पाहणे महत्त्वाचे ठरेल.



## मंगेश शिंदे यांची तालुकाध्यक्षपदी नियुक्ती



**महाड : प्रतिनिधी**

महाराष्ट्र नवनिर्माण सेना ग्रामीण भागात आपल्या पक्षाचा विस्तार करीत असून, पक्षाच्या वतीने सर्व स्तरावरील फेरनियुया नुकत्याच करण्यात आल्या आहेत. यावेळी महाडमधील संघर्षातून पुढे आलेले युवा नेतृत्व मंगेश शिंदे यांची मनसे च्या महाड तालुका अध्यक्षपदी नियुक्ती जाहीर करण्यात आली आहे. राज ठाकरे व शर्मिला ठाकरे यांनी मंगेश शिंदे यांना हे नियुक्ती पत्र देत शुभेच्छा दिल्या आहेत. तसेच यासोबत पंकज उमासरे शहर अध्यक्ष व अमोल दळवी तालुका सचिव पदी नियुक्त करण्यात आले. त्यांच्या या निवडीचे महाड तालुक्यात सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे. पक्षाला मजबूत करणे व राजकीय व सामाजिक स्तरावर पक्षाला स्थान मिळवून देण्याचा प्रामाणिक प्रयत्न करणार असल्याचे यांनी यावेळी सांगितले आहेत.



**खोपोली : भारतीय जनता पक्षाच्या वतीने प्रभाग नंबर ६ मधील प्रलंबित प्रश्नांबाबत उपनगराध्यक्ष विक्रम साबळे यांच्याबरोबर चर्चा करण्यात आली. सदर प्रश्न लवकरात लवकर सोडवण्याचे आश्वासन साबळे यांनी दिले. सदर चर्चेस भाजप खोपोली मंडळ अध्यक्ष अजय इंगुळकर, संजय तन्ना, अमिष पुरी उपस्थित होते.**
(छाया : जयवंत माडपे)

वस्तुनिष्ठ बातम्या आणि आकर्षक जाहिरातींसाठी
रामप्रहर

## उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या माजी सैनिक पाल्यांसाठी विशेष गौरव पुरस्कार व शिष्यवृत्ती

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या माजी सैनिक, वीरपत्नी व त्यांच्या पाल्यांसाठी राज्य शासनामार्फत एकरकमी रु. २० हजार व रु. ५० हजार इतक्या विशेष गौरव पुरस्कारासह शिष्यवृत्ती योजना राबविण्यात येत आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी पात्र लाभार्थ्यांनी १५ सप्टेंबर २०२६ पर्यंत आपले अर्ज जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, रायगड-अलिबाग येथे सादर करावेत, असे आवाहन प्रभारी जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी श्री. चंद्रकांत नारायण फाटक यांनी केले आहे.

या विशेष गौरव पुरस्कारासाठी शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये इयत्ता दहावीच्या परीक्षेत ९० टयांपेक्षा अधिक गुण तसेच इयत्ता बारावीच्या परीक्षेत ८५ टयांपेक्षा अधिक गुण प्राप्त केलेल्या माजी सैनिक व वीरपत्नींच्या पाल्यांचा विचार करण्यात येणार आहे. तसेच राज्यातील गुणवत्ता यादीतील पहिल्या दहा विद्यार्थ्यांनाही विशेष गौरव पुरस्कार प्रदान करण्यात येईल.

याशिवाय, शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये इयत्ता दहावी व बारावीच्या परीक्षेत ६० टयांपेक्षा अधिक गुण मिळविलेल्या माजी सैनिक व वीरपत्नींच्या पाल्यांसाठी शिष्यवृत्ती योजना उपलब्ध असून, इच्छुक व पात्र विद्यार्थ्यांनी आवश्यक कागदपत्रांसह शिष्यवृत्तीचे अर्ज जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, रायगड-अलिबाग येथे निर्धारित मुदतीत सादर करावेत.

पात्र लाभार्थ्यांनी या योजनेचा लाभ घेऊन शासनाच्या प्रोत्साहनपर उपक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्रभारी जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी श्री. चंद्रकांत नारायण फाटक यांनी केले आहे.

## शिलालेखाने उलगडला कोकणाच्या शैव परंपरेचा इतिहास

**अलिबाग : प्रतिनिधी**




अलिबाग तालुक्यातील कुसुंबळे येथील प्राचीन शिवमंदिराच्या जोत्यावर कोरलेल्या ब्रिटिशकालीन शिलालेखामुळे कोकणाच्या धार्मिक आणि सांस्कृतिक इतिहासातील एक महत्त्वाचा अध्याय नव्याने उजेडात आला आहे. शके १८२० (इ.स. १८९८) मधील या चार ओळींच्या शिलालेखाचे संशोधन व वाचन कोकण इतिहास परिषदेचे रायगड जिल्हाध्यक्ष प्रा. डॉ. अंजय धनावडे यांनी केले असून, त्यातून शैव परंपरा, पुरी संप्रदायाची गुरू-शिष्य परंपरा आणि तत्कालीन मंदिर व्यवस्थापनाविषयी महत्वाची ऐतिहासिक माहिती समोर आली आहे. कोकणातील इतिहास संशोधनात शिलालेख, ताम्रपट आणि पुरातत्त्वीय अवशेषांना विशेष महत्त्व आहे, मात्र ब्रिटिशकालीन ग्रामीण मंदिरांशी संबंधित अशा स्वरूपाचा शिलालेख अत्यंत दुर्मिळ मानला जातो. त्यामुळे कुसुंबळे येथील हा शिलालेख इतिहास अभ्यासकांसाठी एक महत्त्वपूर्ण अभिलेखीय पुरावा ठरत आहे.विशेष म्हणजे, ब्रिटिश राजवटीच्या काळात अलिबाग हे प्रशासकीय केंद्र असतानाही ग्रामीण भागातील धार्मिक संस्था, मठपरंपरा आणि मंदिरांचे व्यवस्थापन प्रभावीपणे सुरू असल्याचे या शिलालेखातून स्पष्ट होते. त्या काळात धार्मिक संस्थांनी केवळ पूजा-अर्चाच नव्हे, तर मंदिरांचे संवर्धन, जीर्णोद्धार आणि सामाजिक-धार्मिक परंपरा जपण्याचे कार्यही सातत्याने केले होते.

शिलालेखातील मजकुरात "बुधपुरी, समशेरपुरी, शंकरपुरी व चिदापुरीचे मंदिर होते. त्याचा जीर्णोद्धार नातू देऊपुरी, गुरू मंगळपुरी" असा उल्लेख आढळतो. तसेच "गौरशिवचे पु. पांडू बामणा" अशी नोंदही कोरलेली आहे. शेवटी "शके १८२०, विलंबी नाम संवत्सरे" अशी स्पष्ट कालनोंद असल्यामुळे मंदिराचा जीर्णोद्धार इ.स. १८९८ मध्ये झाल्याचे निश्चित होते.

या शिलालेखातील प्रत्येक नाव धार्मिक परंपरेचा महत्त्वाचा दुवा मानला जात असून, त्यातून त्या काळातील मठसंस्था आणि मंदिर व्यवस्थापनाची सुसंघटित रचना अधोरेखित होते. प्रा. डॉ. धनावडे यांच्या संशोधनानुसार बुधपुरी, समशेरपुरी, शंकरपुरी, चिदापुरी, देऊपुरी आणि मंगळपुरी ही नावे दशनामी गोसावी परंपरेतील पुरी शाखेशी संबंधित असण्याची दाट शक्यता आहे.

## दुखवटा

### गजानन शहासने



**खोपोली** : वरची खोपोली येथील ज्येष्ठ नागरिक गजानन शिवराम शहासने (९२) यांचे रविवारी दुपारी वृद्धापकाळामुळे निधन झाले. पेपको कंपनीतून ते सेवानिवृत्त झाले होते. शहरातील गोकुळाष्टमी उत्सवात त्यांचा प्रमुख सहभाग असायचा. त्यांच्या पश्चात तीन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. काल रात्री अमरधाम स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांना श्रद्धांजली अर्पण केली.

# फिंगरप्रिंटच्या आधारे घरफोडीचा छडा; झारखंडमधून आरोपी जेरबंद

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल शहरातील टिळक रोड परिसरातील एका घरात घरफोडी करून १० लाख ७५ हजार रुपयांचे सोन्याचे दागिने व रोख रक्कम लंपास करणाऱ्या सराईत चोरट्याला पनवेल गुन्हे शाखा कक्ष ३ च्या पथकाने फिंगरप्रिंटच्या आधारे शोधून काढत झारखंडमधून अटक केली आहे. आरोपीकडून ८ लाख रुपयांची रोकड जप्त करण्यात आली असून त्याने इतरही घरफोडीचे गुन्हे केले आहेत का याचा तपास सुरू आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, भारती प्रदीप कदम (वय ५३) या १४ जुलै २०२६ रोजी घराला कुलूप लावून बाहेर गेल्या असताना अज्ञात चोरट्याने घराचा कडी-कोयंडा तोडून आत प्रवेश केला. त्याने घरातील १३.२५ तोळे सोन्याचे दागिने आणि रोख रक्कम असा एकूण १०.७५ लाख रुपयांचा ऐवज चोरून नेला. चोरीस गेलेल्या मुद्देमालात शाही हार, पाटल्या, मोठे व छोटे मंगळसूत्र, सोन्याच्या चेन, कानातील दागिने, नथ, अंगठ्या, नेकलेस तसेच रोख रकमेचा समावेश आहे.

घटनास्थळी फॉरेन्सिक पथक व फिंगरप्रिंट तज्ज्ञांना पाचारण करण्यात आले. तपासादरम्यान घटनास्थळावर मिळालेल्या चान्स प्रिंट (बोटांचे ठसे) नमुन्यांची अंगुलीमुद्रा तज्ज्ञांकडून तपासणी करण्यात आली. प्राप्त अहवालाच्या आधारे आरोपीची ओळख विकाशकुमार दिनेश यादव (वय ३३), रा. अकदोनी खुर्द, पोस्ट बनियाडीह, पोलीस ठाणे मुखसिल, जि. गिरिडीह (झारखंड) अशी पटली. त्यानंतर तांत्रिक विश्लेषण आणि गुप्त बातमीदारांच्या मदतीने गुन्हे शाखा कक्ष-३ च्या पथकाने झारखंड येथे जाऊन आरोपीला अटक केली. त्याच्याकडून ८ लाख रुपयांची रोकड जप्त करण्यात आली असून, इतर घरफोडीच्या गुन्ह्यांबाबतही त्याची चौकशी सुरू आहे.

ही उल्लेखनीय कारवाई सहाय्यक पोलीस आयुक्त (गुन्हे) श्रीमती प्रेरणा कट्टे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा कक्ष-३, पनवेलचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक तानाजी भगत, सहाय्यक पोलीस निरीक्षक सत्यवान बिले, पोलीस उपनिरीक्षक अभयसिंह शिंदे, पोलीस उपनिरीक्षक प्रसाद पाटील, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक अनिल पाटील, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक रमेश शिंदे, पोलीस हवालदार प्रशांत काटकर, प्रमोद राजपूत, अजित पाटील, निलेश पाटील, सागर रसाळ, दिपक डोंगरे, इंद्रजित कानू, रुपेश पाटील, अजिनाथ फुंदे, महिला पोलीस हवालदार हिरकणी पवार, महिला पोलीस नाईक विनया पाटील, पोलीस शिपाई लवकुश शिंगाडे, प्रसाद घरत आणि विक्रांत माळी यांनी पार पाडली.



पनवेल : शेतकरी कामगार पक्षाचे ज्येष्ठ नेते भाऊशेठ पाटील यांनी आपल्या कुटुंबीयांसह आमदार प्रशांत ठाकूर यांच्या कुशल नेतृत्वाखाली भारतीय जनता पक्षाचे कमळ हातात घेत पक्षात अधिकृत प्रवेश केला. शेकापला सोडचिठ्ठी देऊन भारतीय जनता पक्षात प्रवेश केल्यानंतर भाऊशेठ पाटील यांच्यासह पक्षप्रवेश केलेल्या प्रमुख कार्यकर्त्यांनी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची मंगळवारी भेट घेऊन विविध मुद्द्यांवर सविस्तर चर्चा केली. या भेटीदरम्यान लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी प्रवेश कर्त्यांचे पक्षात स्वागत केले आणि त्यांना राजकीय व सामाजिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी महाराष्ट्र वाहतूक संघटनेचे अध्यक्ष प्रभूदास भोईर, खानावचे माजी सरपंच दत्तात्रेय पाटील, तंटामुक्तीचे माजी अध्यक्ष हरिश्चंद्र पाटील, जनार्दन पाटील, ॲड. दिनेश पाटील, विठ्ठल पाटील, वासुदेव पाटील, मारुती पाटील, पंडित पाटील, कुंडलिक पाटील, दिलीप पाटील, अजय पाटील यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.

## सोन्याचे मंगळसूत्र खेचले

**पनवेल** : ४४ वर्षीय महिलेच्या गळ्यातील सोन्याचे मंगळसूत्र खेचून पळून गेल्याप्रकरणी अनोळखी इसमाविरोधात कळंबोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. सिंधू गळवे ह्या सेक्टर दोन कळंबोली येथे राहत असताना त्या एचपी गॅस डिलिव्हरी सेंटर, सेक्टर दोन, कळंबोली येथून पायी चालत जात होत्या. यावेळी त्यांच्या गळयातील १३ ग्राम वजनाचे सोन्याचे मंगळसूत्र हिसकावून अनोळखी इसम पळून गेला.

## श्री मनाचे श्लोक पाठांतर आणि सूर्यनमस्काराची राज्यस्तरीय स्पर्धा

**पनवेल : वार्ताहर**

श्री समर्थ भारत अभियान, पिंपरी-चिंचवड यांच्या वतीने राज्यस्तरीय 'श्री मनाचे श्लोक पाठांतर' आणि 'सूर्यनमस्कार' स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेत लहान बालकांपासून ते प्रौढांपर्यंत सर्व वयोगटातील इच्छुकांना सहभागी होता येणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली.

ही स्पर्धा शालेय, आंतरशालेय आणि राज्यस्तरीय अशा तीन टप्प्यांत पार पडणार आहे. शालेय स्तरावरील स्पर्धा ऑगस्ट-सप्टेंबर महिन्यात, आंतरशालेय स्पर्धा दिवाळीनंतर, तर अंतिम राज्यस्तरीय स्पर्धा जानेवारी २०२७ मध्ये आयोजित करण्यात येणार आहे.

स्पर्धेअंतर्गत समर्थ रामदास स्वामी रचित 'श्री मनाचे श्लोक' पाठांतर तसेच सूर्यनमस्कार या दोन प्रकारांचा समावेश आहे.

प्रत्येक गटातील प्रथम तीन क्रमांकाच्या स्पर्धकांना पारितोषिके, दोन उत्तेजनार्थ पारितोषिके व सन्मानचिन्ह देण्यात येणार आहे. सर्व सहभागी स्पर्धकांना सहभाग प्रमाणपत्रही प्रदान करण्यात येणार आहे.स्पर्धेत अधिकाधिक विद्यार्थी, पालक व नागरिकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन श्री समर्थ भारत अभियानाच्या वतीने करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : प्रा. श्रद्धा कौस्तुभ तारे, विभाग प्रमुख, श्री समर्थ भारत अभियान, पनवेल विभाग. मो. ९६६५४ ७६९९९. येथे साधावा.

## रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयात नूतन विद्यार्थ्यांसाठी ओरिएंटेशन कार्यक्रम



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयात सोमवारी विज्ञान व वाणिज्य शाखेच्या नूतन विद्यार्थ्यांसाठी ओरिएंटेशन कार्यक्रमाचे अतिशय उत्साहपूर्ण वातावरणात आयोजन करण्यात आले होते. नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना उच्च माध्यमिक शिक्षणाची योग्य दिशा, विविध शैक्षणिक संधी, शिस्त, अभ्यासाचे प्रभावी नियोजन आणि भविष्यातील यशस्वी वाटचालीसाठी आवश्यक असणारे मार्गदर्शन करणे हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता.

या कार्यक्रमास प्रमुख पाहुण्या म्हणून रायगड जिल्हा परिषदेच्या उपशिक्षणाधिकारी हेमलता गावित तर आणि जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे व्हाईस चेअरमन वाय.टी. देशमुख हे कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून उपस्थित होते. त्यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना अभ्यासातील सातत्य, ध्येयनिश्चिती आणि कठोर परिश्रमाचे महत्त्व पटवून देत प्रेरणादायी विचार मांडले.

याप्रसंगी संस्थेचे शाळा निरीक्षक संतोष चव्हाण, स्कूल कमिटी मेंबर प्रभाकर जोशी, रामशेठ ठाकूर कॉलेज ऑफ कॉमर्स अँड सायन्सच्या प्राचार्या महेश्वरी झिरपे, रामशेठ ठाकूर माध्यमिकचे मुख्याध्यापक संतोष खांदेकर, विद्यालयाच्या प्राचार्या निशा नायर यांच्यासह विद्यार्थी आणि पालक उपस्थित होते.

उपस्थित सर्व मान्यवरांनी विद्यार्थ्यांना प्रामाणिक परिश्रम, वेळेचे योग्य नियोजन, सकारात्मक दृष्टिकोन आणि मूल्याधिष्ठित शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित करत त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सुरेख व नियोजनबद्ध आयोजन विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी केले.



पनवेल : भारतीय जनता पक्षाच्या उत्तर जिल्हा कामगार आघाडीच्या विविध महत्त्वाच्या पदांच्या नियुक्त्या नुकत्याच जाहीर करण्यात आल्या आहेत. यामध्ये कामगार आघाडीच्या जिल्हा उपाध्यक्षपदी मोहन घाडगे, सहसचिवपदी ललिता शेवाळे, तर सदस्यपदी श्याम भगत यांची निवड करण्यात आली आहे. या सर्व नवनियुक्त पदाधिकाऱ्यांनी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची भेट घेऊन त्यांचे आशीर्वाद घेतले. या प्रसंगी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी सर्व नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करत त्यांना नियुक्ती प्रदान केले आणि संघटनेच्या विस्तारासाठी व कामगारांच्या हितासाठी भावी वाटचालीस हार्दिक शुभेच्छा दिल्या. या वेळी कामगार आघाडीचे जिल्हा अध्यक्ष रवी नाईक, ॲड. महादेव खेरडे, मोतीलाल कोळी, उपेंद्र मराठे, मधुकर उरणकर, भाजपचे खालापूर मंडळ अध्यक्ष सानी यादव यांच्यासह पदाधिकारी आणि इतर मान्यवर उपस्थित होते.

## कल्पतरू इमारतीजवळ गाढी नदीपात्रात अनोळखी मृतदेह

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल शहरातील कल्पतरू इमारतीलगत असलेल्या उद्यानाजवळील गाढी नदीच्या पात्रात मंगळवारी एका अनोळखी तरुणाचा मृतदेह आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली. पुराच्या पाण्याच्या प्रवाहासोबत हा मृतदेह वरच्या भागातून वाहून आला असावा, असा प्राथमिक अंदाज पोलिसांनी व्यक्त केला असून, मृत्यूचे नेमके कारण शोधण्यासाठी तपास सुरू करण्यात आला आहे.

स्थानिक नागरिकांना नदीपात्रातील कचरा आणि चिखलामध्ये एक मृतदेह पडलेला दिसून आला. त्यांनी तत्काळ याबाबत पनवेल शहर पोलिसांना माहिती दिली. माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी दाखल झाले आणि आवश्यक पंचनामा करून मृतदेह नदीपात्रातून बाहेर काढण्यात आला.

पोलिसांच्या प्राथमिक माहितीनुसार, मृत व्यक्तीचे वय अंदाजे २५ ते ३५ वर्षे असून त्याच्या अंगावर मोजकेच कपडे आढळले आहेत. मृताची ओळख अद्याप पटलेली नसून परिसरातील तसेच लगतच्या पोलीस ठाण्यांमध्ये दाखल झालेल्या बेपत्ता व्यक्तींच्या तक्रारींची पडताळणी करण्यात येत आहे.

दरम्यान, हा मृत्यू पाण्यात बुडाल्यामुळे झाला आहे की त्यामागे अन्य काही कारण अथवा घातपात आहे, याचा तपास पोलीस सर्व बाजूंनी करत आहेत. मृतदेह शवविच्छेदनासाठी उपजिल्हा रुग्णालयात पाठविण्यात आला असून, शवविच्छेदन अहवालानंतरच मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होणार असल्याचे पोलिसांनी सांगितले.

या घटनेमुळे परिसरात काही काळ नागरिकांची गर्दी झाली होती. पावसाळ्यात नदी-नाल्यांमध्ये पाण्याचा वेग वाढत असल्याने अशा घटनांच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी नदीकाठच्या परिसरात सावधगिरी बाळगण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे.

## गतिमंद तरुणीवरील अत्याचारप्रकरणी पोलिसांकडून संशयितांचे डीएनए सॅम्पल

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल तालुक्यातील एका मतिमंद तरुणीवर अत्याचार करून ती तरुणी गर्भवती राहिली आणि तिने नुकत्याच एका मुलीला जन्म दिला. या प्रकारानंतर अनोळखी इसमाविरोधात पनवेल तालुका पोलीस ठाण्यात विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला. त्यानंतर पोलिसांनी यातील संशयतांचे डीएनए सॅम्पल घेतले आहेत आणि ते मॅचिंगसाठी कलिना येथे पाठवण्यात आले आहेत.

मतिमंद असलेल्या २४ वर्षीय तरुणीवर अत्याचार केल्याची धक्कादायक घटना पनवेल तालुक्यात उघडकीस आली. ही तरुणी सहा महिन्यांची गर्भवती असल्यानंतर नातेवाईकांच्या ही बाब निदर्शनास आली. त्यानंतर या अविवाहित मतिमंद गरोदर स्त्रीचा सांभाळ करण्यासाठी त्यांनी तिच्या नातेवाईकांकडे तिला ठेवले होते. त्यावेळी तिच्यावर उपचार सुरू होते. तिला रुग्णालयात दाखल केल्यानंतर या तरुणीवर उपचार करणाऱ्या डॉक्टरांनी तिची तपासणी केली. यावेळी आलेल्या रिपोर्ट्स मध्ये ती तरुणी मतिमंद असल्याचे डॉक्टराना दिसून आले. त्यानंतर तिची प्रसूती झाली आणि तिने एका मुलीला जन्म दिला. सध्या ती तरुणी आणि तिचं बाळ हे दोघेही एमजीएम रुग्णालय येथे आहेत. बाळाची प्रकृती स्थिर आहे. त्यानंतर पनवेल तालुका पोलीस ठाण्यात आरोपी विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

## कळंबोली पुलावर लोखंडी होर्डिंग कोसळले; सुदैवाने जीवितहानी टळली

**पनवेल : वार्ताहर**

कळंबोली सर्कल ते मुंब्रा रोडवरील कळंबोली पुलाच्या सुरुवातीला उभारलेले एक मोठे लोखंडी होर्डिंग मंगळवारी अचानक कोसळल्याने काही काळ वाहतुकीत अडथळा निर्माण झाला. मात्र, सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी अथवा दुखापत झाली नाही.



प्रत्यक्षदर्शी ट्रक चालक आणि स्थानिक नागरिकांनी दिलेल्या माहितीनुसार, होर्डिंग अचानक रस्त्यावर कोसळल्याने वाहनचालकांमध्ये काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले. सुदैवाने त्या वेळी होर्डिंगच्या खाली कोणतेही वाहन अथवा नागरिक नसल्याने मोठी दुर्घटना टळली.

घटनेची माहिती मिळताच पोलीस, संबंधित प्रशासन आणि आपत्कालीन यंत्रणेचे अधिकारी तातडीने घटनास्थळी दाखल झाले. रस्त्यावर पडलेले लोखंडी स्ट्रक्चर आणि इतर साहित्य हटविण्याचे काम युद्धपातळीवर हाती घेण्यात आले. त्यामुळे काही काळ वाहतुकीचा वेग मंदावला असला, तरी प्रशासनाच्या तत्परतेमुळे वाहतूक सुरळीत करण्याचे काम वेगाने सुरू असल्याचे सांगितले.

या घटनेनंतर पुलावरील होर्डिंगच्या सुरक्षिततेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, अशा संरचनांची तातडीने तपासणी करून आवश्यक ती कार्यवाही करण्याची मागणी करण्यात येत आहे.

## ईपीआर फाउंडेशनतर्फे जनजागृती अभियान



**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

न्यू इंग्लिश स्कूल खाडपोली येथे ईपीआर फाउंडेशन संस्थापक अपर्णा शहा संस्थापीत "खा-खेळा-वाचा" जनजागृती अभियानांतर्गत सदिच्छा भेट आयोजित करण्यात आली. भारताला निरोगी आणि आनंदी राष्ट्र बनवणे या हेतूने विद्यार्थ्यांना "खा विचारपूर्वक, खेळा उत्साहपूर्वक आणि वाचा उत्स्फूर्तपणे" या संकल्पनेविषयी मार्गदर्शन करण्यात आले.

कार्यक्रमात मुलांना योग्य आहाराचे महत्त्व, खेळाचे फायदे आणि वाचनाची सवय याबाबत माहिती देण्यात आली. तसेच कलाकृती आणि पीपीटीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना आकर्षक पद्धतीने मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थ्यांनीही उत्साहाने सहभाग घेत कार्यक्रमाचा आनंद लुटला.

शिक्षकांनी देखील कार्यक्रमाला उत्स्फूर्त असा प्रतिसाद दिला, काळाचा आणि विद्यार्थ्यांचा हा अत्यंत गरजेचा आणि महत्वाचा विषय आहे असे त्यांनी नमूद केले.

## वेश्याव्यवसायातून नऊ पीडित महिलांची सुटका; पोलिसांची कारवाई

**पनवेल : वार्ताहर**

तळोजा पोलिसांनी वेश्याव्यवसाया विरोधात मोठी कारवाई करत नऊ पीडित महिलांची सुटका केली असून लॉज मॅनेजर व दोन वेटरांना अटक केली आहे. या कारवाईमुळे परिसरातील अवैध मानवी वाहतूक व देहव्यापाराच्या रॅकेटला मोठा धक्का बसला आहे.



पोलिस आयुक्त मिलिंद भारंबे, सहपोलीस आयुक्त दीपक मोघे व अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) प्रमोद शेवाळे यांच्या मार्गदर्शनाखाली मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाने ही कारवाई केली. मिळालेल्या गुप्त माहितीनुसार तळोजा परिसरातील हॉटेल अवॉर्ड इन, लॉजिंग अँड बोर्डिंग येथे महिलांना ठेवून वेश्याव्यवसाय चालविला जात असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती.

यानुसार पोलिसांनी बनावट ग्राहक पाठवून सापळा रचला. छाप्यामध्ये लॉजमध्ये ९ महिलांना वेश्याव्यवसायासाठी ठेवण्यात आल्याचे उघड झाले. तसेच बनावट ग्राहकाकडून पैसे स्वीकारून महिलांना पाठविण्याची व्यवस्था आरोपी करत असल्याचे तपासात निष्पन्न झाले.

या प्रकरणी लॉज मॅनेजर बलराम बंजू गोडा तसेच वेटर गिरीश शेरस पुजारी आणि रुद्रराज शिवेशकुमार पाटील यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता व अनैतिक मानवी व्यापार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तिन्ही आरोपींना अटक करण्यात आली असून न्यायालयाने त्यांना पोलीस कोठडी सुनावली आहे.ही कारवाई सहाय्यक पोलीस आयुक्त शैलेशकुमार अंबटवार यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक गजानन कदम व त्यांच्या पथकाने केली. पुढील तपास तळोजा पोलीस ठाणे करीत आहे.

## संपादकीय

# हे तर राजकीय नाट्य!

संसदेचे अधिवेशन सुरू असताना विरोधी पक्षांकडून सरकारला प्रश्न विचारणे, चर्चेची मागणी करणे, स्थगन प्रस्ताव किंवा इतर संसदीय मार्गांचा अवलंब करणे अपेक्षित असते. त्याऐवजी सुरक्षाव्यवस्थेवर येणाऱ्या कमालीच्या ताणाचा विचार न करता बेपर्वाईने पंतप्रधानांच्या निवासस्थानासमोर धरणे देऊन वातावरण तापविण्याचा प्रयत्न करणे हे लोकशाही प्रक्रियेपेक्षा राजकीय नाट्यावर अधिक भर देणारे वाटते.

**लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी मंगळवारी अकस्मात राजधानी दिल्लीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या निवासस्थानाजवळ ठिय्या आंदोलन केले. अशा संवेदनशील परिसरातील गर्दीमुळे सुरक्षा यंत्रणांवर अनावश्यक ताण निर्माण होतो. असे आंदोलन हे राजकीय संदेश देण्यापुरते मर्यादित राहत नाही. तर पंतप्रधानांच्या निवासस्थानाजवळ आक्रस्ताळे आंदोलन करण्याचा प्रयत्न हा राष्ट्रीय सुरक्षेचाही प्रश्न निर्माण करतो. त्यामुळे राहुल गांधी, प्रियांका गांधी आणि इतर विरोधी नेत्यांनी तेथे केलेल्या आंदोलनानंतर दिल्ली पोलिसांनी त्यांना ताब्यात घेतले. दरम्यान, नीट परीक्षेशी संबंधित पेपरफुटीचे प्रकरण हा राजकारणाचा विषय नाही असे ठणकावत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या प्रकरणातील दोषींना कठोरात कठोर शिक्षा दिली जाईल असे एनडीए संसदीय पक्षाच्या बैठकीत मंगळवारी सांगितले. कॉक्रोच जनता पार्टीच्या (सीजेपी) सोमवारच्या संसद मार्चनंतर प्रथमच पंतप्रधान या विषयावर बोलत होते. विद्यार्थ्यांच्या भविष्याचे नुकसान होऊ नये म्हणून पुनर्परीक्षा घेण्यात आली असून संबंधित प्रक्रिया यशस्वीपणे पूर्ण झाली आहे. भविष्यात असे घडू नये यासाठी व्यवस्था केली जाणार असून पेपर लीकच्या दोषींना शिक्षा देण्यासाठी सर्वांना एकत्र यावे लागेल असेही मोदींनी म्हटले आहे. दरम्यान, मंगळवारचे काँग्रेसचे आंदोलन हे सीजेपी आंदोलनातील पोलिस कारवाईच्या निषेधासाठी असल्याचे सांगितले गेले, परंतु काँग्रेसच्या आंदोलनामुळे विद्यार्थ्यांच्या मूळ प्रश्नांवर चर्चा होण्याऐवजी विरोधी पक्षांमधील राजकीय संघर्षच समोर आला. राहुल गांधींच्या आंदोलनानंतर आम आदमी पक्षाने काँग्रेसवरच उपरोधिक टीका केली. सीजेपीच्या आंदोलनाला काँग्रेसने आपल्या राजकीय अजेंड्याचा भाग बनवल्याने मूळ आंदोलन दुय्यम ठरल्याची भावना अनेक स्तरांतून व्यक्त झाली. कोणत्याही सामाजिक आंदोलनाचे पक्षीय राजकारणात रूपांतर झाल्यास त्याची विश्वासार्हता कमी होतेच. दुसऱ्याच दिवशी आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या मागण्यांपेक्षा राहुल गांधींनी स्वतःवरच प्रकाशझोत येईल असे पाहिले. आम आदमी पक्ष आणि काँग्रेस यांच्यातील वादाने विरोधी आघाडीतील मतभेद पुन्हा उघड केले. लोकशाहीत सरकारवर टीका करताना ती घटनात्मक चौकटीत आणि संसदीय परंपरांचा सन्मान राखून होणेही आवश्यक आहे. पंतप्रधानांच्या निवासस्थानाजवळ आंदोलन करून सुरक्षा व्यवस्थेची कसोटी पाहणे, संसदेतील चर्चेपेक्षा रस्त्यावरील संघर्षाला प्राधान्य देणे आणि सामाजिक आंदोलनांना पक्षीय रंग देणे ही लोकशाही बळकट करणारी नव्हे, तर तिला ध्रुवीकरणाकडे नेणारी प्रवृत्ती आहे. जनतेला राजकीय नाट्य नको आहे तर समस्यांवर ठोस उपाय अपेक्षित आहेत. दुर्दैवाची बाब म्हणजे विद्यार्थ्यांच्या समस्या मंगळवारच्या राजकीय घडामोडींमध्ये मागे पडल्याचे दिसून आले. शिक्षण व्यवस्था, परीक्षा प्रक्रियेतील पारदर्शकता, विद्यार्थ्यांचे भवितव्य आणि त्यांच्यावरील मानसिक ताण यांसारख्या गंभीर मुद्द्यांवर सखोल चर्चा होणे अपेक्षित होते, मात्र दिवसभर माध्यमांमध्ये राहुल गांधींचे आंदोलन, अटक, आरोप-प्रत्यारोप आणि विरोधी पक्षांतील संघर्ष यांचीच चर्चा झाली. लोकशाही व्यवस्थेत विद्यार्थ्यांच्या हिताचा प्रश्न हा राजकीय शक्तिप्रदर्शनापेक्षा मोठा असला पाहिजे. दुर्दैवाने मंगळवारचा दिवस हा विद्यार्थ्यांच्या समस्यांपेक्षा राजकीय नाट्याचाच अधिक भासला.**

# पंढरीच्या वारीचे अनन्यसाधारण महात्म्य!

महाराष्ट्रातील सर्वात मोठा लोकोत्सव म्हणजे पंढरीची वारी. दरवर्षी आषाढी-कार्तिकी एकादशीच्या निमित्ताने देशभरातून लाखो वारकरी पंढरपुरात दाखल होतात. शेकडो किलोमीटरचा पायी प्रवास केल्यानंतर विठुरायाचे झालेले मुखदर्शन साक्षात भगवंतप्राप्ती झाल्याचे सुख त्यांना देते.

आधी रचिली पंढरी, नंतर वैकुंठ नगरी। संत नामदेव महाराजही आपल्या अभंगात सांगतात... जेव्हा नव्हते चराचर, तेव्हा होते पंढरपूर! पृथ्वीवरील केवळ दोनच तीर्थक्षेत्रे नाश न पावणारी आहेत. एक म्हणजे काशी आणि दुसरे म्हणजे पंढरपूर, कारण या क्षेत्रांचा अविनाशी तत्त्व असा महिमा भगवान शंकर आणि विष्णू यांनी आपल्या अखंड वास्तव्याने कथन केला आहे. काशीमध्ये शंकराचे आणि पंढरपूरमध्ये विष्णूचे स्थूल रूपात अस्तित्व आहे; म्हणूनच प्रत्येक हिंदू इहलोकाची यात्रा संपवण्यापूर्वी एकदा तरी काशीस अथवा पंढरपूरला जावे, अशी इच्छा बाळगून असतो. अशी थोरवी प्राप्त झालेले हे पंढरपूर तीर्थक्षेत्र आहे.

पृथ्वीवरी तीर्थे असती अपार। परी पंढरीची सर एकाही नाही॥ असा दाखला संत नामदेव महाराज देतात, तर न करी आळस। जाय पंढरीशी। अवघी सुखराशी। तेथे आहे॥ असे संत चोखामेळा यांनी म्हटले आहे. काशीच्या पाच यात्रा, द्वारकेला तीन वेळा जाणे, या दोन्ही



यात्रांनी जेवढे पुण्य मिळते, तेवढेच पुण्य एका पंढरपूरच्या वारीने मिळते. सर्व सुखाचे आगर आणि संत मंडळींचे माहेरघर असल्यानेच 'अवघी दुमदुमली पंढरी। भगव्या पताका खांद्यावरी। तुळशी वृंदावन डोक्यावरी। भाव भुकेल्यांची ही वारी।,' असे म्हटले जाते.

संत ज्ञानेश्वरांनी वारी या व्रताचा प्रारंभ केला. तेव्हापासून चालू असलेल्या वारीमुळे पंढरपुरातील श्री विठ्ठलाची मूर्ती जागृतावस्थेत आली आहे. वारकरी राम कृष्ण हरी । असे नामसंकीर्तन सतत करत पंढरीस जातात. कलियुगात ईश्वराची कृपा संपादन करणाऱ्या एका व्यक्तीपेक्षा सर्व मिळून जेव्हा कृपा संपादनाचा प्रयत्न करतात, तेव्हा ती समष्टी साधना होते. वारीमध्ये व्यष्टीसह समष्टी साधनाही होते आणि सर्व जिवांच्या उद्धारासाठी विठ्ठलाला पंढरपुरात भूतलावर यावेच लागते. या तीर्थाचा महिमाच असा आहे. येथील भक्तांच्या तळमळीमुळे विठ्ठलाला पंढरपुरात यावेच लागते.

पंढरपूरच्या वारीने आपल्या जीवनात भक्तीचा अखंड झरा पाझरू लागतो. भावभक्तीचे बीज प्रत्येकाच्या अंतर्मनात रूजवणारी ही वारी पृथ्वीच्या अंतापर्यंत अशीच चालू रहाणार आहे. भक्तांच्या संकटसमयी धावून येण्यासाठी, आपल्या भक्तांची इच्छा पूर्ण करण्यासाठी विठ्ठल पंढरपुरात उभा आहे. देव भावाचा भुकेला आहे याची प्रचीती घ्यायची असल्यास पंढरपूरला जावे. शिस्तीचे दर्शन हे पालख्यांचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणावे लागेल. प्रत्येक दिंडीची रचना ठरलेली आहे. प्रारंभी भगवे ध्वजधारी वारकरी, मग तुळशी-वृंदावन घेतलेल्या महिला, त्यामागे टाळकरी, नंतर विणेकरी अशीच सर्व दिंड्यांची रचना असते. टाळ वाजवणाऱ्या वारकऱ्यांचा पदन्यासही लयबद्ध असतो. भले टाळकरी-वारकरी शेकडोंच्या संख्येने का असेना! वैयक्तिक जीवनातील अभिनिवेष बाजूला ठेवून ईश्वराच्या नामस्मरणात देहभान विसरायला लावणारा आध्यात्मिक सोहळा म्हणजे पंढरपूरची वारी!

पांडुरंग हे सामान्यांचे दैवत आहे. पांडुरंगाचा रंग सावळा आहे आणि कृष्णही सावळाच आहे. काळा रंग हा अद्वैताचा आहे. वृंदावनातील गोपी कृष्णाला म्हणत, ''अरे कृष्णा, तू अमावास्येला अंगावर काळी घोंगडी घेऊन यमुनाकाठी कदंब वृक्षावर बसलास की, तू आम्हाला दिसतच नाहीस; कारण रात्र काळी, यमुना काळी, तू काळा आणि घोंगडीही काळीच! अशा वेळी हे सर्व अद्वैत होऊन जाते.''

संत ज्ञानदेव म्हणतात, 'तुज सगुण म्हणों कीं निर्गुण रे। सगुण निर्गुण एकु गोविंदु रे।' म्हणजेच तो सगुण आहे आणि निर्गुणही आहे. त्याचे सगुण स्वरूप हे निर्गुणच आहे. तो स्वच्छ म्हणजे निर्मळ आहे. त्याची इंद्रिये विकाररहित आणि स्वच्छ आहेत. तो आत-बाहेर स्वच्छ आहे; म्हणून तो 'पांडुरंग' आहे. एकदा लहानपणी संत ज्ञानेश्वर आणि मुक्ताबाई खेळत असतांना मुक्ताबाई ज्ञानदेवांना म्हणाली, ''अरे दादा, तू या पांडुरंगाला निर्गुण म्हणतोस; परंतु हा तर सगुण स्वरूपात येथे कटीवर हात ठेवून उभा आहे.'' त्यावर संत ज्ञानेश्वर महाराज म्हणतात, ''मुक्ता, मी तुला गुरुमुखातून सांगतो. अगं, हा निर्गुणी बुंद (बिंदु) सगुणी उतरला आहे.'' एकूणच हा निर्गुणच सगुण स्वरूपात इथे दिसत आहे. तो कष्टकरी, शेतकरी, सामान्यजन आणि अनाथ यांचा कैवारी आहे; म्हणून तो (उन्हात कष्ट करून रापलेला असा) काळ्या रंगाचा झाला आहे. असा हा सगुण-निर्गुण रूपी पांडुरंग आहे.

**-मोक्षदा घाणेकर, काळाचौकी, मुंबई**

# महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

देवेंद्र गंगाधरराव फडणवीस एक कर्तृत्ववान नेते असून ते सध्या महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून कार्यरत आहेत. आज त्यांचा वाढदिवस... भारतीय जनता पक्षाकडून महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. वयाच्या ४४व्या वर्षी ते महाराष्ट्राचे दुसरे सर्वांत तरुण मुख्यमंत्री झाले. फडणवीस हे महाराष्ट्र विधानसभेतील नागपूर दक्षिण पश्चिम मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करतात. भाजपकडून ते महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री आणि वसंतराव नाईक यांच्यानंतर महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून त्यांचा संपूर्ण कार्यकाळ पूर्ण करणारे दुसरे मुख्यमंत्री होत.

देवेंद्र फडणवीस यांचा २२ जुलै १९७० जन्म नागपुरात झाला. त्यांचे वडील गंगाधर फडणवीस यांनी नागपूर येथून महाराष्ट्र विधान परिषदेचे सदस्य म्हणून काम पाहिले. देवेंद्र फडणवीस यांनी इंदिरा कॉन्व्हेंटमधून प्रारंभिक शालेय शिक्षण घेतले. त्यांची आई सरिता फडणवीस, ज्या अमरावतीच्या काळोटी घराण्याची वंशज. त्या विदर्भ हौसिंग क्रेडिट सोसायटीच्या माजी संचालक होत्या.




आणीबाणीच्या वेळी देवेंद्र फडणवीस यांचे वडील जनसंघ सदस्य होते. त्यांना सरकारविरोधी निषेधात भाग घेतल्यामुळे तुरुंगात टाकले गेले होते. त्यानंतर फडणवीस यांनी इंदिरा कॉन्व्हेंटमध्ये शालेय शिक्षण सुरू ठेवण्यास नकार दिला. पंतप्रधानांच्या नावावर असलेल्या शाळेत जाण्याची इच्छा नव्हती, कारण त्यांनी आपल्या वडिलांना तुरूंगात डांबले होते. यानंतर त्यांनी सरस्वती विद्यालय शाळेत बदली केली, जिथे बहुतेक शालेय शिक्षण घेतले.

दहा वर्षे शालेय शिक्षण पूर्ण झाल्यानंतर फडणवीस यांनी धरमपेठ कनिष्ठ महाविद्यालयात उच्च माध्यमिक शिक्षण घेतले. बारावी पूर्ण झाल्यानंतर त्यांनी नागपूरच्या शासकीय लॉ कॉलेजमध्ये पाच वर्षांच्या इंटिग्रेटेड लॉ पदवीसाठी प्रवेश घेतला आणि १९९२मध्ये पदवी घेतली.

देवेंद्र फडणवीस यांचे अमृता फडणवीस यांच्याशी लग्न झाले असून त्यांना एक मुलगी दिविजा ही आहे. फडणवीस यांनी राजकीय कारकीर्दीची सुरुवात नव्वदच्या दशकाच्या मध्यापासून केली. तेव्हापासून त्यांनी आपल्या राजकीय पक्षासाठी आणि निवडून आलेल्या प्रतिनिधी म्हणून अनेक नेतृत्व भूमिकांमध्ये काम केले. महाविद्यालयीन विद्यार्थी म्हणून, फडणवीस हे भाजप संलग्न अखिल भारतीय विद्यार्थी परिषद (एबीव्हीपी)चे सक्रिय सदस्य होते. त्यांनी राम नगर प्रभागातून प्रथम नगरपालिका निवडणूक जिंकली.

पाच वर्षांनंतर फडणवीस नागपूर महानगरपालिकेचे सर्वांत तरुण महापौर झाले आणि ते भारताच्या इतिहासातील दुसऱ्या क्रमांकाचे नगराध्यक्ष झाले. १९९९पासून ते महाराष्ट्र राज्याच्या विधानसभेत नागपूरचे प्रतिनिधित्व करीत आहेत. ते सध्या राज्याचे मुख्यमंत्रिपद समर्थपणे भूषवित आहेत. अभ्यासू नेता अशी त्यांची ओळख आहे. वक्तृत्व, कर्तृत्व आणि नेतृत्व या तिन्ही पातळ्यांवर ते उजवे आहेत. त्याचबरोबर चौफेर संचार, दूरदर्शीपणा, संयमी व्यक्तिमत्व असे त्यांचे गुण आहेत. अशा या उमद्या नेत्याला वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा! (साभार इंटरनेट)



## बदलते तंत्रज्ञान

### इंटरनेट नसतानाही होणार UPI पेमेंट

देशातील कोट्यवधी UPI युजर्ससाठी महत्त्वाची बातमी समोर आली आहे. येत्या काळात इंटरनेट कनेक्शन नसतानाही UPI द्वारे पेमेंट करणे सोपे होणार आहे. बिझनेस स्टँडर्डच्या वृत्तानुसार, भारतात अशी UPI सुविधा विकसित केली जात आहे, ज्यामुळे ग्राहक आणि व्यापाऱ्याचे पॉइंट-ऑफ-सेल (PoS) टर्मिनल हे दोन्ही इंटरनेटशी कनेक्ट नसतानाही व्यवहार करता येऊ शकणार आहे.



या प्रस्तावित सुविधेमध्ये नियर-फील्ड कम्युनिकेशन, म्हणजेच NFC तंत्रज्ञानाचा वापर केला जाणार आहे. NFC सुविधा असलेला स्मार्टफोन व्यापाऱ्याच्या ऑफलाइन PoS टर्मिनलवर टॅप करून ग्राहकांना पैसे भरता येतील. रिपोर्टनुसार, या माध्यमातून एका व्यवहारात २ हजार रुपयांपर्यंत पेमेंट करता येणार आहे.

कसे होणार इंटरनेटशिवाय UPI पेमेंट?

या सुविधेचा वापर करण्यासाठी ग्राहकाला इंटरनेट उपलब्ध असताना आपल्या डिव्हाइसमधील UPI Lite वॉलेटमध्ये आधी पैसे जमा करावे लागतील. त्यानंतर इंटरनेट कनेक्शन नसतानाही वॉलेटमधील शिल्लक रक्कम वापरून ऑफलाइन PoS टर्मिनलवर पेमेंट करता येईल. विशेष म्हणजे, अशा व्यवहारासाठी प्रत्येक वेळी UPI पिन टाकण्याची गरज भासणार नसल्याचे रिपोर्टमध्ये म्हटले आहे. ग्राहकाला NFC सुविधा असलेला फोन संबंधित PoS टर्मिनलवर टॅप करावा लागेल आणि पेमेंटची प्रक्रिया पूर्ण होईल.

विमान आणि मेट्रोमध्येही होऊ शकतो फायदा

ही सुविधा विशेषतः ज्या ठिकाणी इंटरनेट कनेक्टिव्हिटी उपलब्ध नसते किंवा नेटवर्क सातत्याने खंडित होते, अशा ठिकाणी उपयुक्त ठरू शकते. विमान प्रवासादरम्यान तसेच भूमिगत मेट्रो किंवा रेल्वे नेटवर्कमध्ये या सुविधेचा मोठा फायदा होण्याची शक्यता आहे. रिपोर्टनुसार, नॅशनल पेमेंट्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया अर्थात NPCI २०२६ मध्ये प्रमुख PoS टर्मिनल उत्पादक कंपन्यांच्या उपकरणांचे सर्टिफिकेशन सुरू करू शकते.

PoS कंपन्यांना घ्यावे लागणार NPCIचे सर्टिफिकेशन

नव्या प्रस्तावित प्रणालीमध्ये इंटरनेट उपलब्ध नसताना PoS टर्मिनल पेमेंटचे ऑथरायझेशन तात्पुरते स्टोअर करून ठेवेल. इंटरनेट कनेक्टिव्हिटी पुन्हा सुरू झाल्यानंतर व्यवहाराची माहिती पडताळणी आणि पुढील प्रक्रियेसाठी पाठवली जाईल.

# दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार

महाराष्ट्राचे स्व. उपमुख्यमंत्री अजित अनंतराव पवार यांची आज जयंती. याच वर्षी विमान अपघातात त्यांचे निधन झाले होते. त्यांनी २०१० ते २०२६पर्यंत त्यांच्या मृत्यूपर्यंत आठ वर्षांहून अधिक काळ सहा वेळा महाराष्ट्राचे सर्वाधिक काळ उपमुख्यमंत्री म्हणून काम पाहिले.

अजित पवार यांचा जन्म २२ जुलै १९५९ रोजी महाराष्ट्रातील देवळाली प्रवरा येथे अनंतराव आणि आशाताई पवार यांच्या पोटी झाला. १९८५मध्ये त्यांनी सुनेत्रा पवार (माहेरच्या पाटील) यांच्याशी विवाह केला. या दाम्पत्याला पार्थ आणि जय पवार असे दोन मुलगे आहेत. अजित पवार यांनी १९८२मध्ये एका सहकारी साखर कारखान्याच्या संचालक मंडळावर निवडून आल्यावर राजकारणात पहिले पाऊल ठेवले. १९९१मध्ये ते पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष म्हणून निवडून आले आणि पुढील १६ वर्षे या पदावर राहिले. पुढे १९९१मध्ये ते बारामती लोकसभा मतदारसंघातून पहिल्यांदा लोकसभेवर निवडून आले. नंतर त्यांनी ही जागा त्यांचे काक ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्यासाठी रिक्त केली. अजितदादा त्यांच्या स्पष्टवक्त्या आणि अनोख्या नेतृत्वशैलीसाठी ओळखले जात होते.



**निमित्त**

अजित पवार यांना निर्वाचित पदांचा दांडगा अनुभव होता. विशेषतः उपमुख्यमंत्री म्हणून त्यांनी राज्याच्या प्रशासनावर मोठा प्रभाव टाकला. अर्थमंत्री म्हणून त्यांनी राज्याचा अर्थसंकल्प सांभाळला.


२०२३मध्ये ते सत्ताधारी महायुतीमध्ये दाखल झाले आणि २ जुलै रोजी राज्याचे उपमुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. २०२४च्या विधानसभा निवडणुकीत महायुतीने प्रचंड विजय मिळवून बहुमताचे सरकार स्थापन केले. पवार यांनी पुन्हा उपमुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली आणि त्यांच्याकडे अर्थ खात्यासारखी खाती सोपवण्यात आली.

२८ जानेवारी २०२६ रोजी अंदाजे ८.४४ भारतीय प्रमाणवेळेनुसार मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावरून महाराष्ट्रातील बारामती विमानतळाकडे जाणाऱ्या एअर चार्टर फ्लाइटने पवार यांना घेऊन जाणारे बिझनेस जेट बारामती विमानतळाच्या रनवे ११वर दुसऱ्यांदा उतरण्याचा प्रयत्न करत असताना कोसळले. विमान रनवेवरून बाजूला गेले, त्याला आग लागली आणि आदळल्याने ते पूर्णपणे नष्ट झाले. परिणामी पवार आणि विमानातील इतर चौघांचा मृत्यू झाला.

घटनेच्या वेळी पवार आगामी जिल्हा परिषद निवडणुकांच्या निमित्ताने अनेक जाहीर सभांना संबोधित करण्यासाठी बारामतीला प्रवास करत होते. त्यांच्या निधनानंतर महाराष्ट्र सरकारने तीन दिवसांचा दुखवटा जाहीर केला. २९ जानेवारी रोजी बारामती येथे त्यांच्यावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले.

राज्य शासनाने एक महत्त्वपूर्ण निर्णय घेत राज्याचे नेते स्व. अजित पवार यांच्या जयंतीचा समावेश सन २०२६मधील राष्ट्रपुरुष व थोर व्यक्तींच्या अधिकृत जयंती कार्यक्रमांमध्ये केला आहे. सामान्य प्रशासन विभागाने या संदर्भातील अधिकृत परिपत्रक जारी केले असून अजितदादांच्या लोकसेवेचा आणि महाराष्ट्राच्या विकासातील त्यांच्या योगदानाचा राज्य शासनाकडून गौरव करण्यात आला आहे. पवार यांची जयंती २२ जुलै रोजी राज्यभरात साजरी केली जाणार आहे. (साभार इंटरनेट)

## चित्र रंगवा





## आरोग्य प्रहर

### डाळिंबाची साल फेकून न देता 'या' प्रकारे करा वापर

त्वचेचे सौंदर्य कायम टिकवून ठेवण्यासाठी महिला सतत काहींना काही करत असतात. लाल चुटुक डाळिंबाचे दाणे आरोग्य आणि त्वचेसाठी अतिशय गुणकारी आहेत. डाळिंब खाल्ल्यानंतर डाळिंबाच्या साली फेकून दिल्या जातात. मात्र या सालींमध्ये अनेक औषधी गुणधर्म आढळून येतात.

धूळ, माती, प्रदूषण आणि अपचनामुळे त्वचा अतिशय निस्तेज आणि तेलकट होऊन जाते. तेलकट झालेल्या त्वचेवर लगेच पिंपल्स किंवा ॲक्ने येतात. त्यामुळे सुंदर त्वचेची पूर्णपणे वाट लागून जाते. अशावेळी कोणत्याही हानिकारक केमिकल युक्त प्रॉडक्टचा वापर न करता घरगुती पदार्थांचा वापर करून त्वचेची काळजी घ्यावी. म्हणूनच आज आम्ही तुम्हाला डाळिंबाच्या सालीचा वापर कसा करावा? यामुळे त्वचेला नेमके काय फायदे होतात? याबद्दल सविस्तर माहिती सांगणार आहोत.



डाळिंब सोलून झाल्यानंतर डाळिंबाच्या उरलेल्या साली कडक उन्हात व्यवस्थित सुकवून घ्याव्यात. या साली सुकल्यानंतर कडक होतील. मिक्सरच्या भांड्यात डाळिंबाच्या सुकलेल्या साली टाकून बारीक पावडर तयार करून घ्या. डाळिंबाच्या सालींची गुलाबी पावडर तयार होईल. डाळिंबाच्या सालीच्या पावडरमध्ये गुलाब पाणी टाकून पेस्ट तयार करा. तयार केलेली पेस्ट संपूर्ण त्वचेवर लावून काहीवेळ तशीच ठेवा. त्यानंतर पाण्याने त्वचा स्वच्छ धुवून घ्या. यामुळे त्वचेवर वाढलेल्या सुरकुत्या आणि बारीक रेषा कमी होण्यास मदत होईल.

डाळिंबाच्या सालींमध्ये अँटी-बॅक्टेरियल आणि अँटी-इंफ्लेमेटरी गुणधर्म आढळून येतात. यामुळे त्वचेवर वाढलेले पिंपल्स आणि मुरूम कमी होण्यास मदत होते. कमी वयात त्वचेवर वाढलेला कोरडेपणा, टॅनिंग आणि इतर समस्यांपासून आराम मिळवण्यासाठी डाळिंबाच्या सालीचा वापर करावा. डाळिंबाच्या सालीमध्ये असलेले अँटी-ऑक्सिडंट्स त्वचेमधील घट्टपणा कायम टिकवून ठेवतात. तसेच त्वचेची खराब झालेली गुणवत्ता सुधारण्यास मदत होते. त्वचेवर वाढलेले काळे डाग आणि पिंपल्स घालवण्यासाठी डाळिंबाच्या सालींचा फेसपॅक बनवून लावावा.

(हा लेख केवळ सामान्य माहितीसाठी लिहिण्यात आला असून कोणत्याही प्रकारच्या उपचाराचा दावा यामध्ये करण्यात आलेला नाही. कोणताही उपाय करण्यापूर्वी आपल्या डॉक्टरांचा सल्ला घ्या.)

# महाड-विन्हेरे मार्गावर अपघातांची मालिका सुरूच! टेम्पोची एसटीला धडक; चालकासह चार प्रवासी जखमी

**महाड : प्रतिनिधी**

महाड-विन्हेरे राज्य महामार्गावर गतवर्षीप्रमाणे यंदाही पावसाळ्यात अपघातांची मालिका सुरूच असून मंगळवार २१ जुलै रोजी सकाळी सुमारे ९.२० च्या सुमारास कुर्ले दिवेकरवाडी फाट्याजवळ समोरून येणाऱ्या टेम्पोने एसटी बसला जोरदार धडक दिल्याने भीषण अपघात घडला. या अपघातात टेम्पो चालकाला गंभीर स्वरूपाची दुखापत झाली असून एसटीतील चार प्रवासी किरकोळ जखमी झाले आहेत.



महाड आगाराची मुमुर्शी- महाड ही एसटी बस क्रमांक एमएच २० बीएल ३७९५ महाडच्या दिशेने येत असताना कुर्ले दिवेकरवाडी फाट्याजवळ पोहोचताच समोरून येणाऱ्या टेम्पो क्रमांक एमएच ०६ बीडब्ल्यू ६२१५ वरील चालकाचे उतारावर नियंत्रण सुटल्याने टेम्पो विरुद्ध दिशेला जाऊन समोरून थेट एसटी बसवर आदळला. धडक इतकी भीषण होती की टेम्पोच्या पुढील भागाचा अक्षरशः चक्काचूर झाला, तर एसटी बसचे देखील मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. या अपघातात टेम्पो चालकाच्या पायाला गंभीर स्वरूपाची दुखापत झाली असून त्याला पुढील उपचारासाठी महाड येथील रानडे रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

एसटी बसमधील ३४ प्रवाशांपैकी भूमिका कासारे वय २१, प्रगती कासारे वय ३३, पुष्पा यादव वय ४०, तिघीही रा. कुर्ले बौद्धवाडी तसेच काशीराम कुले वय ७७, रा. करंजाडी हे चार प्रवासी किरकोळ जखमी झाल्याने त्यांना उपचारासाठी महाड ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. अपघाताची माहिती मिळताच पोलिस, एसटी प्रशासनाचे अधिकारी व कर्मचारी तातडीने घटनास्थळी दाखल झाले. विभागातील युवासेना नेते पप्या अंबावले यांनी जखमींना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यासाठी सहकार्य केले. या दरम्यान मंत्री भरतशेठ गोगावले यांनी व्हिडिओ कॉलद्वारे अपघाताची माहिती घेऊन संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या.

अपघातग्रस्त टेम्पो चालकाने प्राथमिक माहितीत सांगितले की, उतारावर रस्ता ओला असल्याने वाहन घसरले आणि टेम्पोवरील नियंत्रण सुटल्याने हा अपघात घडला. गतवर्षीही महाड-विन्हेरे राज्य महामार्गावर पावसाळ्यात वारंवार अपघात घडल्यामुळे प्रवासी व नागरिकांनी सार्वजनिक बांधकाम विभाग तसेच संबंधित ठेकेदाराविरोधात तीव्र नाराजी व्यक्त केली होती.

# सुधागड तालुक्यातील कोशिंबळे धबधब्याच्या डोहात स्थानिकाचा मृत्यू

**पाली : प्रतिनिधी**

सुधागड तालुक्यातील कोशिंबळे व नागशेत गावाच्या हद्दीत असलेल्या धबधब्याच्या डोहामध्ये एक स्थानिक नागरिक बुडाल्याची घटना सोमवारी (ता. २०) सायंकाळी पाच वाजेच्या सुमारास घडली. मिलिंद मारुती दिघे (वय ४८) असे धबधब्याच्या पाण्यात बुडालेल्या नागरिकाचे नाव असून रात्री साडेदहाच्या सुमारास धबधब्याच्या पुढे या व्यक्तीचा मृतदेह सापडला.

आपदा मित्र अमित निंबाळकर यांच्यातर्फे मिळालेल्या माहितीनुसार, मिलिंद दिघे हे आपल्या काही मित्रांसोबत कोशिंबळे येथील धबधब्यावर भिजण्यासाठी गेले होते. मात्र,



पाण्याचा अंदाज न आल्यामुळे ते धबधब्याच्या खोल डोहामध्ये बुडाले. या घटनेची माहिती मिळताच स्थानिक आपदा मित्र आणि शेलार मामा रेस्क्यू टीमचे सदस्य तात्काळ मदतकार्यासाठी घटनास्थळी दाखल झाले. यावेळी नागरिकांनी मोठी गर्दी केली होती.

रेस्क्यू टीमच्या जवानांनी जीवाची पर्वा न करता रात्रीच्या अंधारात धबधब्याच्या पाण्याच्या प्रवाहात उतरून शोधकार्य सुरू केले. मात्र, डोंगराळ भागातील तीव्र अंधार आणि पावसामुळे धबधब्यातील पाण्याचा प्रवाह आणि वेग सातत्याने वाढत असल्याने शोधकार्यात मोठा अडथळा निर्माण झाला होता.

# महाड एमआयडीसीमधील दोन कंपन्यांवर कृषी विभागाची कारवाई

**महाड : प्रतिनिधी**

महाड औद्योगिक वसाहतीमधील कोप्राण आणि सिद्धार्थ कलरकेम या दोन कंपन्यांत वापर होत असलेल्या युरिया खतामध्ये निंबोळी घटक आढळल्याने कृषी विभागाकडून कारवाई करण्यात आली आहे. कृषी विभागाने महाड एम.आय.डी.सी. पोलीस ठाण्यात याबाबत तक्रार दाखल केली असून पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. मात्र या दोन्ही कंपन्यांनी हे खत कृषी क्षेत्रातील अंतर्गत नियमातील नसून रीतसर मागवण्यात आल्याचे सांगून यावर आपण कायदेशीर खुलासा मागून




पुन्हा तपासणी करण्याची मागणी केल्याचे स्पष्टीकरण दिले आहे.

महाड एम.आय.डी.सी. मधील कोप्राण रिसर्च आणि सिद्धार्थ कलरकेम या दोन कंपन्यांवर कृषी विभागाच्या खत निरीक्षकांनी धाड टाकत कंपनीत वापर होत असलेल्या युरिया खताचे नमुने एप्रिल महिन्यात तपासणीसाठी पाठवले होते. या तपासणीमध्ये कंपन्यात वापर होत असलेल्या खतामध्ये निंबोळीयुक्त घटक कांही प्रमाणात आढळला आहे. त्यामुळे हे खत कृषी क्षेत्रात वापर होत असलेल्या खाताशी निगडीत आहे का याची खात्री करण्यासाठी तपासणी केली जात आहे. सदर खत हे कंपन्यांनी रीतसर आणि कायदेशीररीत्या ट्रेडर्स मधून खरेदी केलेले असले तरी त्यात आढळलेल्या निंबोळी घटकामुळे या दोन्ही कंपन्या चर्चेत आल्या आहेत. खत निरीक्षक सुरजकुमार संपतराव लांडगे यांनी याबाबत आलेल्या तपासणी अहवालानुसार महाड औद्योगिक पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. सिद्धार्थ कलरकेम आणि कोप्राण कंपनीवर गुन्हा दाखल केला आहे.

याबाबत महाड औद्योगिक पोलिसांनी आणि खत निरीक्षकांनी दिलेल्या माहितीनुसार या दोन्ही कंपनीत भेट दिली असता कोप्राण कंपनीतील युरिया खताचे नमुने आणि सिद्धार्थ मधील नमुने नाशिक मधील प्रयोग शाळेत तपासणी साठी पाठवले होते. या प्रयोगशाळेतून आलेल्या अहवालानुसार सबसिडीयुक्त निंबोळी लेपित खताचा अनधिकृत वापर आढळून आल्याचे खत निरीक्षक सुरजकुमार संपतराव लांडगे यांनी सांगितले. त्यानुसार या दोन्ही कंपन्यांवर कारवाई करण्यात आली आहे. सिद्धार्थ कलरकेमचे व्यवस्थापक प्रशांत मारुती लाखन आणि कोप्राण कंपनीचे व्यवस्थापक मणिलाल शांताराम पाटील यांच्यावर हा गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत अधिक तपास महाड पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक व्ही.बी. फडतरे हे करत आहेत

**फेरतपासणीची कंपन्यांची मागणी**

महाड औद्योगिक पोलीस ठाण्यात कृषी विभागाने तक्रार दाखल केल्यानंतर गुन्हा दाखल झाला असला तरी कंपन्यांनी आपल्या कंपनीतील कांही उत्पादनासाठी युरिया खत क्षुल्लक प्रमाणात लागत असल्याचे सांगून हे युरिया खत मुंबई वरून शासनाच्या सर्व नियमांतून आणि सर्व विभागाच्या कर भरल्यानंतरच आमच्या पर्यंत पोहोचत असल्याचा खुलासा केला आहे. शिवाय हे युरिया खत बाहेरून देशातून मुंबई मधील ट्रेडर्स मागवून घेतात आणि तेथून ट्रेडर्स च्या माध्यमातूनच आमच्यापर्यंत पोहोचत असल्या कारणाने झालेली कारवाई बरोबर वाटत नसल्याचा दावा केला आहे. त्यामुळे आम्ही तत्काळ फेरतपासणी करण्याची मागणी न्यायालयीन आदेशानुसार करणार असल्याचे स्पष्टीकरण देखील कंपन्यांनी दिले आहे.

# हमरापूर छत्रपती संभाजी महाराज नगरमध्ये सिमेंट रस्त्याचे उद्घाटन

**पेण : प्रतिनिधी**

हमरापूर येथील छत्रपती संभाजी महाराज नगरमध्ये जिल्हा परिषदेच्या सेस फंडातून १० लाख रुपये निधी खर्च करून करण्यात आलेल्या सिमेंट काँक्रीट रस्ता आणि प्रवेश कमानीचे उद्घाटन कृषी व पशुसंवर्धन समिती सभापती वैकुंठ पाटील आणि भाजप महिला मोर्चा उपाध्यक्षा शर्मिला पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत फित कापून या कामाचे उद्घाटन झाले.



या कार्यक्रमाला माजी सरपंच सुभाष दाभाडे, माजी सरपंच प्रदीप म्हात्रे, भाजप कार्यकर्ते महेंद्र पाटील, ग्रामपंचायत सदस्य ओमकार पाटील, प्रसिद्ध गणेश मूर्तिकार वैभव ठाकूर, विलास रोकडे, मंगल कोळी, संदीप जंगम, विजय ठाकूर यांच्यासह परिसरातील मान्यवर, ग्रामस्थ आणि महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

सिमेंट काँक्रीटीकरणाचे काम दर्जेदार झाल्याबद्दल उपस्थित ग्रामस्थांनी सभापती वैकुंठ पाटील यांचे आभार मानले. गेल्या अनेक वर्षांपासून रस्त्याची मागणी होती ती आता पूर्ण झाली असल्याने रहिवाशांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

यावेळी बोलताना सभापती वैकुंठ पाटील म्हणाले की,"ग्रामस्थांच्या सहकार्यामुळेच ही विकास कामे शक्य झाली आहेत. पेण तालुक्यातील प्रत्येक गावात मूलभूत सुविधा पोहोचवण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. यापुढेही अशीच कामे होतील असे सांगीतले.

# भाजप किसान मोर्चाने कर्जमाफीबद्दल मुख्यमंत्र्यांचे मानले आभार

**पाली : प्रतिनिधी**

राज्य शासनाने शेतकरी बांधवांसाठी जाहीर केलेल्या दोन लाख रुपयांपर्यंतच्या कर्जमाफीच्या आणि ४८ हजार कोटी रुपयांच्या जुन्या वीज बिल थकबाकी माफीच्या ऐतिहासिक निर्णयाचे दक्षिण रायगड भाजप किसान मोर्चाचे जिल्हाध्यक्ष सुजित बारसकर यांनी उत्स्फूर्त स्वागत केले आहे. या क्रांतिकारी निर्णयाबद्दल त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे जाहीर आभार अभिनंदन केले असून जिल्ह्यातील समस्त शेतकरी वर्गाच्या वतीने त्यांचे विशेष आभार मानले आहेत.



भाजपा किसान मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष रामकृष्ण वेताळ यांच्या मार्गदर्शनाखाली किसान मोर्चाने नेहमीच शेतकऱ्यांच्या प्रश्नांना प्राधान्य दिले असून शासनाचा हा निर्णय बळीराजाला मोठा दिलासा देणारा ठरला असल्याचे बारसकर यांनी सांगितले. या संदर्भात सुजित बारसकर यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, राज्यातील बळीराजा गेल्या काही वर्षांपासून सातत्याने विविध संकटांचा सामना करत आहे. कधी ऐन हंगामात येणारा अवकाळी पाऊस, कधी दुष्काळ तर कधी निसर्गाच्या लहरीपणामुळे शेतीचे मोठे नुकसान होत होते. त्यातच शेतीचा वाढता उत्पादन खर्च आणि बाजारभावातील चढ-उतार यामुळे शेतकरी आर्थिक अडचणीत सापडला होता. या सर्व बाबींची संवेदनशीलतेने दखल घेऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दोन लाख रुपयांपर्यंतची कर्जमाफी जाहीर केली. हा निर्णय केवळ आर्थिक मदत नसून शेतकरी कुटुंबांना नवीन उमेद देणारा ठरेल.

या निर्णयासोबतच सरकारने साडेसात हॉर्स पॉवरपर्यंतच्या कृषिपंपांचे वीज बिल आधीच माफ केले होते, मात्र जुनी थकबाकी शिल्लक असल्याने अनेक शेतकऱ्यांना नवीन वीज जोडणी मिळण्यात अडचणी येत होत्या. मुख्यमंत्र्यांनी ४८ हजार कोटी रुपयांची ही जुनी थकबाकी देखील पूर्णपणे माफ करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. यामुळे शेतकऱ्यांच्या डोक्यावरील कर्जाचा आणि थकबाकीचा मोठा भार हलका झाला असून ग्रामीण अर्थव्यवस्थेला एक नवी गती मिळणार आहे. सिंचन प्रकल्प, कृषी क्षेत्रातील आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रसार आणि विविध कल्याणकारी योजनांच्या माध्यमातून हे सरकार नेहमीच शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिले आहे. शेतकरी समृद्ध झाला तरच राज्य प्रगती करेल या विचाराने घेतलेले हे निर्णय अत्यंत कौतुकास्पद आहेत, असे नमूद करत बारसकर यांनी मुख्यमंत्र्यांचे पुनश्च आभार मानले आहेत.

# माथेरानमध्ये पावसाचे दमदार पुनरागमन



**माथेरान : बातमीदार**

आठ दिवसांच्या विश्रांतीनंतर रायगड जिल्ह्यात पावसाने पुन्हा दमदार हजेरी लावली असून माथेरान पर्यटनस्थळी देखील पावसाला जोरदार सुरुवात झाली आहे.वर्षा सहलीसाठी पर्यटक मोठ्या संख्येने माथेरान पर्यटनस्थळी येत असून इथल्या मुसळधार पावसात भिजण्याचा मनसोक्त आनंद घेत आहेत.पावसासोबत वारे सुद्धा जोरदार वाहत असल्याने याठिकाणी झाडे पडण्याच्या घटना अजून सुरूच आहेत.

रायगड जिल्ह्यातील सर्वच भागात पावसाने दमदार हजेरी लावली आहे.त्यामुळे शेतीच्या कामांना आता वेग येणार आहे.मागील काही दिवसांपासून माथेरान पर्यटनस्थळी ढगाळ वातावरण होते.अधून मधून येथेएखादी पावसाची सर कोसळत होती.मात्र मागील दोन दिवसांपासून येथील डोंगरमाथ्यावर जोरदार पावसाच्या सरी कोसळत आहेत.पावसामुळे वातावरणात गारवा निर्माण झाला असून पर्यटक मात्र या वातावरणाचा आणि पावसाचा आनंद घेताना येथे दिसत आहेत.गेल्या आठ दिवसांपासून पावसाने दडी मारल्याने माथेरान पर्यटनस्थळी आलेल्या पर्यटकांना पावसात भिजता आले नाही.यावर्षी जुलै महिन्याच्या पहिल्या आठवड्यात रायगड जिल्ह्यात अतिवृष्टी झाली होती.मुसळधार पावसामुळे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते.त्यानंतर पावसाने अचानक विश्रांती घेतल्याने माथेरान पर्यटनस्थळी येणाऱ्या पर्यटकांचा हिरमोड झाला होता.या विकेंड पासून पुन्हा पावसाने दमदार पुनरागमन केल्याने येथे येणारा पर्यटक या मुसळधार पावसात वर्षा सहलीचा मनसोक्त आनंद घेत आहे.

# कर्जत स्थानकावर १५ डब्यांच्या लोकलचे स्वागत

**कर्जत : प्रतिनिधी**

मुंबई छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथून सायंकाळी ६.२१ वाजता सुटणारी १५ डब्यांची लोकल प्रथमच रात्री ८.४० वाजता कर्जत स्थानकात दाखल झाली. या ऐतिहासिक क्षणाचे औचित्य साधत स्थानकावर मोटरमन व ट्रेन मॅनेजर यांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत करण्यात आले. यां लोकलमुळे संध्यकाळी मुंबईहून कर्जतकडे येणाऱ्या प्रवाशांना दिलासा मिळणार आहे.



१५ डब्यांची लोकल कर्जत रेल्वे स्थानकातील फलाट क्रमांक दोन वर आली. यावेळी झेडआरयूसीसी सदस्य नितीन परमार, कर्जत रेल्वे पॅसेंजर हक्क समितीचे सतीश मुसळे, सुयश मुसळे तसेच स्टेशन प्रबंधक पी. के. लाल उपस्थित होते. ही लोकल घेऊन येणारे मोटरमन हरिहर राव आणि ट्रेन मॅनेजर चंद्रशेकर कुशवाह यांचा परमार यांनी सत्कार केला. त्यानंतर ही लोकल पाऊणे नऊच्या सुमारास मुंबईकडे रवाना झाली.

कार्यालयीन वेळेनंतर मुंबईहून कर्जतकडे परतणाऱ्या प्रवाशांना दररोज प्रचंड गर्दीचा सामना करावा लागत होता. १२ ऐवजी १५ डब्याची लोकल झाल्याने गर्दी कमी होऊन प्रवास अधिक सुरक्षित व सोयीस्कर होण्याची अपेक्षा आहे. या लोकलचा लाभ खोपोलीहून येणारे तसेच पुण्याहून इंद्रायणी एक्सप्रेसने कर्जतला उतरून मुंबईकडे जाणाऱ्या प्रवाशांनाही होणार आहे. मध्य रेल्वेने मुख्य मार्गावरील आणखी काही लोकल १५ डब्यांच्या करण्याचा निर्णय घेतल्याने उपनगरी प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार आहे.

'प्रवाशांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला अखेर अंशतः यश मिळाले आहे. १५ डब्यांची लोकल सुरू झाल्यामुळे गर्दीच्या वेळेतील प्रवास अधिक सुरक्षित आणि सुसह्य होईल. खोपोली तसेच इंद्रायणी एक्सप्रेसमधून येणाऱ्या प्रवाशांनाही याचा मोठा फायदा होणार असून कर्जतकर प्रवाशांसाठी ही अत्यंत स्वागतार्ह सुरुवात आहे. कर्जतसाठी आणखी लोकल वाढविण्यासाठी पाठपुरावा करणार आहोत. तसेच वाटनुकुलीत लोकल साठीही प्रयत्नशील आहोत.

# मजगाव मराठी शाळेस माजी विद्यार्थ्याकडून पुस्तकांची भेट

**मुरुड : प्रतिनिधी**

आदर्श शाळा मजगाव मराठी शाळेचे माजी विद्यार्थी मच्छिंद्र मानाजी यांनी आपल्या वाढदिवसानिमित्त सुमारे पाच हजार रुपये खर्च करून शाळेप्रती असलेली कृतज्ञता व्यक्त करत विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी शालेय उपयोगी पुस्तकांची भेट दिली. यामध्ये शैक्षणिक तसेच मुलांना अवांतर वाचन व्हावे यासाठी विविध गोष्टींची पुस्तकांचा समावेश होता.त्यांच्या या उदात्त सहकार्यामुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रवासाला मोलाची साथ लाभली आहे. या आगळ्या वेगळ्या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांन मधे वाचनाची आवड निर्माण होवून त्यांच्या ज्ञानात भर पडेल व मुलांनमधे चांगले



संस्कार घडण्यास मदत होणार आहे.या

पुस्तकांचा स्वीकार शाळेच्या मुख्याध्यापिका , शिक्षकवृंद व शाळाव्यवस्थापन समितीचे अध्यक्ष,उपाध्यक्ष आणि सदस्य यांच्या उपस्थितीत करण्यात आला. यावेळी उपस्थितांनी . मच्छिंद्र मानाजी यांच्या सामाजिक बांधिलकीचे कौतुक करत त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. माजी विद्यार्थ्यांनी आपल्या शाळेशी नाते जपून अशा विधायक उपक्रमांत सहभागी व्हावे, असे आवाहनही शाळेच्या मुख्याध्यापिका धुमाळ मॅडम यांनी केले. या शाळेच्या मुख्याध्यापिका रेश्मा धुमाळ यांनी सांगितले की,माजी विद्यार्थी यांनी शाळेबाबत असणारे प्रेम पुस्तक रूपाने भेट देऊन व्यक्त केले आहे.

मच्छिंद्र मानाजी यांनी वाढदिवस साजरा करण्याचा हा वेगळा आणि प्रेरणादायी उपक्रम राबवून समाजापुढे आदर्श निर्माण करून वेगळा पायंडा पाडला इतर ही त्यापासून प्रेरणा घेतील असा विश्वास धुमाळ यांनी व्यक्त केला.

## सावधान नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटिसद्वारे कळविण्यात येते की, आमचे आशिल **श्री. प्रमोद कृष्णा शेळके,** रा. विंधणे, ता. उरण, जि. रायगड यांनी १) श्रीमती अस्मिता काशिनाथ घरत, रा. जिते, ता. पनवेल, जि. रायगड २) श्री. जगदीश हसुराम पाटील, ३) श्री. प्रमोद हसुराम पाटील, ४) बयोबाई हसुराम पाटील, ५) श्रीमती स्मिता सूर्याजी पाटील, २ ते ५ सर्वजण रा. केळवणे, ता. पनवेल, जि. रायगड. संबंधित जमीन मालकांसोबत खाली नमूद केलेल्या स्थावर मालमत्तेच्या खरेदीसंदर्भात सामंजस्य करार (MOU) केला असून, सदर करारानुसार बयाना म्हणून एकूण रु. ५,००,०००/- (अक्षरी रु. पाच लाख रुपये मात्र) रक्कम अदा केलेली आहे. त्याबाबतची बयाना पावती व इतर कागदपत्रे आमच्या अशिलांच्या ताब्यात आहेत.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे-दिघाटी, ता-पनवेल, जि-रायगड**

| भुमापन क्र. | भुमापन क्रमांकाचा उपविभाग | भूधारणा पद्धती | क्षेत्र(हे.आर.चौ.मी.) | आकार पै. |
|---|---|---|---|---|
| ५० | ९ | भो. वर्ग २ | ०.३२.००<br>पो.ख. ०.०५.००<br>एकूण ०.३७.०० | ०.७५ |

असे असताना, संबंधित मालक/मालकांकडून सदर मालमत्तेबाबत तृतीय पक्षाशी विक्री, हस्तांतरण, करार किंवा इतर कोणताही व्यवहार करण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे आमच्या अशिलांच्या निदर्शनास आले आहे. त्यामुळे, सर्व संबंधितांना याद्वारे सावध करण्यात येते की, सदर मालमत्तेबाबत कोणत्याही प्रकारचा खरेदी-विक्री व्यवहार, करार, इसार, बयाना, हस्तांतरण, गहाण, हक्कनिर्मिती किंवा इतर कोणताही व्यवहार करू नये. अन्यथा असा व्यवहार करणारी व्यक्ती तो स्वतःच्या जोखमीवर व परिणामांची पूर्ण जबाबदारी स्वीकारून करीत आहे, असे समजले जाईल.

सदर मालमत्तेबाबत कोणत्याही तृतीय पक्षाने व्यवहार केल्यास किंवा कोणताही हितसंबंध निर्माण केल्यास, त्याविरुद्ध तसेच संबंधित विक्रेता/मालकांविरुद्ध उपलब्ध कायद्यानुसार आवश्यक ती दिवाणी व फौजदारी कारवाई, तसेच विशिष्ट करार अंमलबजावणी (Specific Performance), कायमस्वरूपी मनाई आदेश (Permanent Injunction) व इतर योग्य न्यायालयीन उपाययोजना करण्यात येतील. अशा व्यवहारामुळे उद्भवणाऱ्या कोणत्याही प्रकारच्या नुकसानास किंवा परिणामास आमचे अशिल कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाहीत तसेच सदरहू त्रयस्थ इसमाणे केलेला करार हा आमच्या अशिलांवर बंधनकारक नसेल हे सर्वांस कळावे.

**सही/-**
**ॲड. धिरज लहू डाकी**
**रा.बोरखार, पो. दिघोडे, ता. उरण,**
**जि-रायगड,४१०२०६ मो. नं. ८१०८५४९१८३**

**उरण**
**दिनांक : २२/०७/२०२६**

# नवी मुंबई महापालिका वृक्ष संवर्धनासाठी 'एसओपी' तज्ज्ञांचे घेणार मार्गदर्शन

## मार्च-एप्रिलमध्येच होणार मान्सूनपूर्व छाटणी

**नवी मुंबई : बातमीदार**

मुसळधारा आणि वादळी वाऱ्यामुळे जुलैच्या पहिल्या आठवड्यात नवी मुंबईत मोठ्या प्रमाणावर झाडे उन्मळून पडली. या घटनांनंतर महापालिकेने त्यामागील कारणांचा शास्त्रीय अभ्यास हाती घेतला. यामध्ये झाडे पडण्यास केवळ अतिवृष्टी कारणीभूत नसून, वाढते काँक्रीटीकरण, मुळांचे होणारे नुकसान, अशास्त्रीय छाटणी, अयोग्य वृक्षप्रजातींची निवड आणि शहरी विकासातील काही त्रुटी तेवढ्याच जबाबदार असल्याचे वृक्षतज्ज्ञांनी स्पष्ट केले. या निष्कर्षांच्या आधारे झाडांच्या देखभाल आणि व्यवस्थापनासाठी स्वतंत्र मानक कार्यपद्धती (एसओपी) तयार करण्याचा निर्णय महापालिकेने घेतला आहे.



महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली शुक्रवारी झालेल्या विशेष बैठकीत उद्यान विभागाच्या उपआयुक्त स्मिता काळे यांच्यासह वृक्षतज्ज्ञ श्रीकांत इंगळहळीकर, डॉ. चंद्रकांत साळुंखे, शर्वरी बर्वे, सारंग फळे आणि वृक्ष विशेषज्ज्ञ (अर्बोरिस्ट) वैभव राजे यांनी सहभाग घेतला. बैठकीत जुलै महिन्यात कोसळलेल्या झाडांचा सविस्तर आढावा घेत भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी आवश्यक उपाययोजनांवर चर्चा करण्यात आली.

तज्ज्ञांच्या मते, शहरातील रस्ते आणि गृहनिर्माण संस्थांच्या परिसरातील सिमेंट काँक्रीटमुळे झाडांच्या मुळांना वाढण्यासाठी आवश्यक जागा मिळत नाही. त्यातच केबल, जलवाहिन्या आणि इतर भूमिगत सुविधांसाठी होणाऱ्या खोदकामामुळे मुळे कापली जातात. त्यामुळे झाडांची जमिनीवरील पकड कमकुवत होऊन वादळी पावसात ती उन्मळून पडतात. रस्त्यालगत आणि गृहनिर्माण संस्थांच्या परिसरातील ९० टक्क्यांहून अधिक झाडे याच कारणांमुळे पडतात, तर गावठाण आणि झोपडपट्टी भागात काँक्रीटीकरण कमी असल्याने तेथे झाडे पडण्याचे प्रमाण अत्यल्प असल्याचे तज्ज्ञांनी नमूद केले.

उंच इमारतींमुळे झाडांना पुरेसा सूर्यप्रकाश मिळत नसल्याने ती प्रकाशाच्या दिशेने झुकतात. 'फोटो ट्रॉपिझम' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या प्रक्रियेमुळे झाडांचे नैसर्गिक संतुलन बिघडते. तसेच अनेक गृहनिर्माण संस्थांमध्ये झाडांची शास्त्रीय पद्धतीने छाटणी न करता एकाच बाजूने किंवा वरच्या भागाची छाटणी केली जाते. त्यामुळे वादळी वाऱ्याचा ताण वाढून झाडे पडण्याचा धोका अधिक वाढत असल्याचे बैठकीत निदर्शनास आले.

पहिल्या पावसानंतर पानांवर पाणी साचल्याने झाडांचे वजन वाढते. त्याचवेळी मुळांभोवती पाणी साचून माती सैल होते. किनारपट्टीवरील शहर असल्याने नवी मुंबईत भूजल पातळी उंच असून त्यामुळे झाडांची पकड आणखी कमकुवत होण्याची शक्यता वाढते. वृक्षप्रजातींची निवडही महत्त्वाची असल्याचे तज्ज्ञांनी स्पष्ट केले. फायकस प्रजातीची झाडे रस्त्यालगत लावणे योग्य नसल्याचे, तर गुलमोहर आणि सोनमोहर या वृक्षांचे लाकूड ठिसूळ असल्याने त्यांच्या फांद्या तुटण्याचे प्रमाण अधिक असल्याचे सांगण्यात आले. याउलट नारळ आणि ताडाची झाडे वादळाचा तुलनेने चांगला सामना करतात.

जुलैतील अतिवृष्टीदरम्यान मुंबई महानगर प्रदेशातील इतर शहरांप्रमाणे नवी मुंबईतही मोठ्या प्रमाणावर झाडे पडली होती. या पार्श्वभूमीवर महापालिकेने तज्ज्ञांचा सल्ला घेऊन प्रथमच झाडांच्या पडझडीमागील कारणांचा शास्त्रीय अभ्यास सुरू केला आहे. मात्र, या बैठकीतील शिफारशी प्रत्यक्ष अंमलबजावणीत कितपत उतरतात आणि अनियंत्रित काँक्रिटीकरण तसेच अशास्त्रीय छाटणीवर कितपत नियंत्रण मिळते, यावरच पुढील पावसाळ्यात झाडांच्या पडझडीचे प्रमाण कमी होणार की नाही, हे अवलंबून राहणार आहे.

राष्ट्रीय हरित लवाद आणि शहरी वनीकरणाच्या मार्गदर्शक तत्त्वांचा आधार घेत महापालिका आता झाडांच्या देखभालीसाठी स्वतंत्र कार्यपद्धती तयार करणार आहे.झाडांच्या मुळांबरोबरच शेंड्याचे व्यवस्थापन करून त्यांची उंची आणि आकार संतुलित ठेवण्यावर भर दिला जाणार आहे. तज्ज्ञांच्या देखरेखीखालीच संतुलित छाटणी केली जाईल. झाडांच्या छाटणीसाठी स्वतंत्र 'एसओपी' तयार करून मार्च किंवा एप्रिल महिन्यात मान्सूनपूर्व छाटणी करण्याचे नियोजन आहे. ऑक्टोबर महिन्यात छाटणी टाळण्याचा निर्णयही घेण्यात आला आहे.

झाडांच्या छाटणीपूर्वी आणि नंतरची छायाचित्रे घेणे बंधनकारक करण्यात येणार असून, सध्या झुकलेल्या झाडांचे स्वतंत्र दस्तऐवजीकरण केले जाईल. प्रत्येक झाडाचा स्वतंत्र अभ्यास करून पुढील निर्णय घेतला जाईल.अलीकडे पडलेल्या झाडांचे दृश्य मूल्यांकन केले जाणार असून, त्यांची यापूर्वी छाटणी झाली होती का, याचा वर्षभराचा तपशील तपासला जाईल. आवश्यकतेनुसार आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने धोकादायक झाडांचे जोखीम मूल्यांकनही करण्यात येणार आहे.

सफाई अपनाओ, बिमारी भगाओ अभियान

## नवी मुंबई पालिकेचे विशेष स्वच्छता पथक पंढरपूरला रवाना



**नवी मुंबई : बातमीदार**

आषाढी वारीनिमित्त पंढरपूर येथे लाखो भाविक दाखल होत असल्याने परिसर स्वच्छ व आरोग्यदायी ठेवण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या 'सफाई अपनाओ – बिमारी भगाओ' अभियानांतर्गत नवी मुंबई महानगरपालिकेचे विशेष स्वच्छता पथक पंढरपूर येथे कार्यरत राहण्यासाठी रवाना झाले. महापौर सुजाता पाटील यांनी या स्वच्छता पथकास उत्तम कामासाठी शुभेच्छा दिल्या आणि हे पथक पंढरपूरकडे रवाना झाले.

महापालिका आयुक्त डॉ कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनानुसार, घनकचरा व्यवस्थापन उपायुक्त डॉ. अजय गडदे यांच्या नियंत्रणाखाली या स्वच्छता मोहिमेत प्रत्यक्ष पंढरपूरमध्ये स्वच्छता निरीक्षक लवेश पाटील व नवनाथ ठोंबरे यांच्या नेतृत्वाखाली स्वच्छता कामे करण्यात येणार आहेत. या पथकात २ स्वच्छता निरीक्षक, ३० स्वच्छता दूत तसेच मलनिःस्सारण विभागाची दोन सक्शन-अँड-जेटिंग सक्षम युनिट्स कार्यरत असणार आहेत.

२१ व २२ जुलै रोजी ही विशेष स्वच्छता मोहीम पंढरपूर क्षेत्रात राबविण्यात येणार असून मंदिर परिसर, प्रमुख मार्ग, सार्वजनिक ठिकाणे, स्वच्छतागृहे तसेच मलनिःस्सारण व्यवस्थेची स्वच्छता व निर्जंतुकीकरणाची कामे प्राधान्याने करण्यात येणार आहेत. महापालिकेचे विशेष स्वच्छता पथक पंढरपूर शहर स्वच्छ, सुरक्षित व रोगमुक्त ठेवण्यासाठी समर्पित भावनेने कार्य करणार असून भाविकांना स्वच्छ व निरोगी वातावरण उपलब्ध करून देण्यासाठी कटिबद्ध असेल.

# एपीएमसीची सुरक्षा रामभरोसे! उपकेंद्रात विजेचा धक्का लागून अनोळखी व्यक्तीचा मृत्यू

**नवी मुंबई : बातमीदार**

राष्ट्रीय महत्त्वाच्या बाजार मुंबई एपीएमसीच्या सुरक्षा व्यवस्थेवर पुन्हा एकदा गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झालं आहे. फळ मार्केटमधील एक्स्पोर्ट हाऊससमोरील विद्युत उपकेंद्रात विजेचा धक्का लागून एका अनोळखी व्यक्तीचा मृत्यू झाला आहे. या घटनेनंतर बाजारातील रात्रीची सुरक्षा, अनधिकृत प्रवेश आणि संशयितांच्या वर्दळीबाबत अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत. पाहूया हा विशेष रिपोर्ट

राष्ट्रीय महत्त्वाच्या मुंबई एपीएमसीमध्ये १६ जुलै रोजी घडलेल्या या घटनेने संपूर्ण बाजार परिसर हादरला आहे. फळ मार्केटमधील एक्स्पोर्ट हाऊससमोरील विद्युत उपकेंद्रात एका अनोळखी व्यक्तीचा विजेचा धक्का लागून मृत्यू झाला. माहिती मिळताच एपीएमसी पोलीस घटनास्थळी दाखल झाले. पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आला असून आकस्मिक मृत्यूची नोंद करून तपास सुरू करण्यात आला आहे.

मात्र या घटनेमुळे अनेक गंभीर प्रश्न समोर आले आहेत. संबंधित व्यक्ती उच्चदाबाच्या विद्युत उपकेंद्रापर्यंत कशी पोहोचली? त्याला प्रवेश कसा मिळाला? आणि तो त्या ठिकाणी नेमका काय करत होता? या सर्व बाबींचा तपास पोलीस करत आहेत.



दरम्यान, बाजारातील काही व्यापारी व कामगाराच्या दावा आहे की, रात्रीच्या वेळी काही संशयित व्यक्ती बाजार परिसरात मुक्तपणे वावरतात. त्यांच्या म्हणण्यानुसार, काही जण अमली पदार्थांचे सेवन करतात, रात्री उशिरापर्यंत सुरू असलेल्या कँटीनमध्ये जेवण आणि चायनीज खाद्यपदार्थ खातात आणि त्यानंतर चोरीच्या उद्देशाने बाजारात फिरतात. काही पानटपऱ्यांवर रात्री उशिरापर्यंत गुटखा, तंबाखू आणि इतर प्रतिबंधित पदार्थांची विक्री होत असल्याचाही आरोप व्यापाऱ्यांनी केला आहे. म्हणजे अमली पदार्थ सेवन आणि विक्री करणाऱ्या लोकांना सुरक्षित ठिकाण राष्ट्रीय बाजार आहे . या आरोपांची अधिकृत पुष्टी झालेली नसून संबंधित यंत्रणांनी त्याची चौकशी करावी, अशी मागणी होत आहे.

काही दिवसांपूर्वी अवघ्या तीन दिवसांत चोरीचे सहा प्रयत्न झाल्याचा दावा व्यापाऱ्यांनी केला आहे. त्यापैकी तीन संशयितांना व्यापाऱ्यांनी पकडून पोलिसांच्या ताब्यात दिल्याचेही सांगितले जाते. सर्वात महत्वाचे बाब अशी आहे की ज्यावेळी अन्न औषध प्रशासन व पोलिस अधिकारी बाजार आवारात कारवाई साठी येतात त्यावेळी संबंधित टोळीला अगोदर माहिती याच सुरक्षा कर्मचऱ्याकडून देण्यात येत त्यामुळे ही टोळी आजपर्यंत बाजार आवारात बाबरतात .अशी माहिती काही व्यापाऱ्यांनी दिली आहे .त्यामुळे प्रश्न उपस्थित होतो जर व्यापारीच चोर पकडत असतील, तर सुरक्षा विभागाची भूमिका नेमकी काय?

व्यापाऱ्यांचा आणखी एक आरोप म्हणजे, काही ठिकाणी संरक भिंतींचा वापर करून रात्रीच्या वेळी अनधिकृत प्रवेश केला जातो. काही विद्युत उपकेंद्रे पुरेशा सुरक्षेविना असल्याने कोणालाही त्या परिसरात पोहोचणे आणि त्याच ठिकाणी अमली पदार्थ सेवन करत असतात . एवढेच नव्हे तर काही विद्युत उपकेंद्रांजवळ पुठ्ठे, लाकडी पेट्या आणि इतर ज्वलनशील साहित्य साठवून ठेवले जात असल्याने भविष्यात मोठी दुर्घटना घडण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक आबासाहेब पाटील यांनी सांगितले की घटनेचा सर्व बाजूंनी तपास सुरू आहे. आवश्यक त्या बाबींची चौकशी केली जात असून बाजार समितीला सुरक्षा व्यवस्था अधिक सक्षम करण्याबाबत सूचना करण्यात येणार आहेत.

राष्ट्रीय महत्त्वाच्या बाजाराच्या सुरक्षेसाठी दरवर्षी कोट्यवधी रुपयांचा खर्च होत असताना अशा घटना घडत असतील, तर सुरक्षा व्यवस्थेच्या कार्यक्षमतेवर प्रश्न उपस्थित होणे स्वाभाविक आहे.

**व्यापाऱ्यांच्या विविध मागण्या**

या घटनेनंतर बाजार घटकांनी पुढील मागण्या केल्या आहेत

-संपूर्ण सुरक्षा व्यवस्थेचे स्वतंत्र ऑडिट
-संरक्षक भिंतींची तातडीने दुरुस्ती
-सर्व विद्युत उपकेंद्रांची सुरक्षा वाढविणे
-रात्रीची गस्त आणि सीसीटीव्ही देखरेख मजबूत करणे
-अनधिकृत प्रवेश आणि बेकायदेशीर हालचालींवर विशेष मोहीम राबविणे.

## संदीप नाईक प्रतिष्ठानतर्फे आज आरोग्य शिबिर

**नवी मुंबई :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त संदीप नाईक प्रतिष्ठानतर्फे मोफत आरोग्य तपासणी शिबिर २२ जुलै सकाळी १० ते दुपारी २ वाजेपर्यंत माजी उपमहापौर अशोक गावडे यांच्या प्रमुख उपस्थितीत भाजप जनसंपर्क कार्यालय, नेरूळ से. २८ येथे, तर प्रभाग क्रमांक २४मधील सफाई कर्मचाऱ्यांचा (आरोग्यदूत) सत्कार आयोजित करण्यात आला आहे.

## जगदीश ठाकूर यांची उपाध्यक्षपदी नियुक्ती

**पनवेल : वार्ताहर**

शिवसेना प्रणित जय महाराष्ट्र माथाडी आणि जनरल कामगार सेनेच्या मावळ लोकसभा क्षेत्राच्या उपाध्यक्ष पदावर जगदीश ठाकूर यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

ही नियुक्ती मुख्यनेते तथा राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आदेशाने करण्यात आली असून मावळ लोकसभेचे खासदार श्रीरंग बारणे यांच्या सहकार्याने ही जबाबदारी त्यांच्यावर सोपविण्यात आली आहे. संघटनेचे अध्यक्ष डेव्हिड जेरी आणि उपाध्यक्ष राजा ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली ही नियुक्ती जाहीर करण्यात आली.

जगदीश ठाकूर हे संघटनात्मक कामात सक्रिय असतात. नव्या जबाबदारीच्या माध्यमातून ते संघटनेला अधिक बळकट करतील, कामगारांपर्यंत योजनांचा लाभ पोहचवतील आणि त्यांच्या हक्कांसाठी प्रभावीपणे आवाज उठवतील, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. या नियुक्तीबद्दल ठाकूर यांचे अभिनंदन करण्यात येत असून पुढील कार्यकाळासाठी त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या.





## आज भाजपतर्फे भव्य रक्तदान शिबिर

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त बुधवार २२ जुलै रोजी सकाळी ९ ते सायं. ५ वाजेपर्यंत स्वयंभु गणेश मंदिर, चिंचोली तलाव जवळ, शिरवणे येथे भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आलेले असल्याचे माजी महापौर जयवंत सुतार यांनी सांगितले. सदर रक्तदान शिबिराचा शुभारंभ माजी आमदार संदीप नाईक व भाजप नवी मुंबईचे जिल्हाध्यक्ष डॉ. राजेश पाटील यांच्या हस्ते होणार असून रक्तदात्यांनी या सामाजिक उपक्रमास सहभागी व्हावे, असे आवाहन माजी महापौर जयवंत सुतार यांनी कळविले आहे.

# नवी मुंबईतील समाजमंदिरांचा खासगी गोदाम म्हणून वापर? मुख्यमंत्र्यांकडे चौकशीची मागणी

**नवी मुंबई : बातमीदार**

सीबीडी-बेलापूर विभागातील नवी मुंबई महापालिकेच्या काही समाजमंदिरांचा व सभामंडपांचा मंडप डेकोरेटर्सकडून कथितपणे खासगी गोदाम म्हणून वापर होत असल्याचा आरोप करत या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे करण्यात आली आहे.सारथी सुरक्षा सेवा संस्थेचे सरचिटणीस विनय मोरे यांनी मुख्यमंत्री यांना निवेदन पाठवून सार्वजनिक मालमत्तेचा कथित गैरवापर तातडीने थांबविण्याची मागणी केली आहे.

निवेदनानुसार सर्वसामान्य नागरिकांच्या करातून उभारण्यात आलेली समाजमंदिरे व सभामंडप हे सामाजिक, सांस्कृतिक आणि सार्वजनिक उपक्रमांसाठी उपलब्ध असणे अपेक्षित असताना, काही ठिकाणी मंडप डेकोरेटर्सचे साहित्य मोठ्या प्रमाणात ठेवून या जागांचा खासगी गोदामाप्रमाणे वापर होत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. स्थानिक अधिकाऱ्यांकडे याबाबत विचारणा केल्यास "याबाबत माहिती नाही, मुख्य कार्यालयात विचारा," अशी उडवाउडवीची उत्तरे मिळत असल्याचाही दावा करण्यात आला आहे.विशेषतः सीबीडी-बेलापूर सेक्टर-४ मधील बी/१० कॉलनीजवळील सभामंडप तसेच गौरव वाचनालयासमोरील सभामंडपाची तातडीने प्रत्यक्ष पाहणी करून तेथे ठेवण्यात आलेल्या साहित्याची मालकी, संबंधितांना दिलेली परवानगी, वापराचा कालावधी आणि त्यासाठी महानगरपालिकेकडे अधिकृत शुल्क भरले जाते का, याची सखोल चौकशी करण्याची मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

मोरे यांनी निवेदनात उपरोधिक शब्दांत म्हटले आहे की, जर कोणत्याही अधिकृत परवानगीशिवाय सार्वजनिक सभामंडपांचा खासगी गोदाम म्हणून वापर करण्याची मुभा असेल, तर इतर नागरिकांनाही महापालिकेच्या सार्वजनिक जागांवर कार्यालय किंवा गोदाम सुरू करण्याची समान परवानगी आहे का याचा प्रशासनाने खुलासा करावा.

मुख्यमंत्र्यांकडे करण्यात आलेल्या प्रमुख मागण्यांमध्ये संपूर्ण नवी मुंबईतील सर्व समाजमंदिरे व सभामंडपांचे सर्वेक्षण, अनधिकृत वापराची चौकशी, संबंधित साहित्य हटविणे, जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई, प्रत्येक सभामंडपाबाहेर वापराच्या नियमावलीचे फलक लावणे, आरक्षण प्रक्रिया ऑनलाइन व पारदर्शक करणे आणि संबंधित सभामंडपांच्या चौकशीचा अहवाल लेखी स्वरूपात देण्याचा समावेश आहे.

"सार्वजनिक मालमत्ता ही कोणत्याही व्यक्तीची किंवा राजकीय प्रभाव असलेल्या घटकांची खासगी मालमत्ता नसून ती सर्वसामान्य नागरिकांच्या करातून उभारलेली सार्वजनिक संपत्ती आहे. त्यामुळे तिचा वापर नियमबद्ध, पारदर्शक आणि सर्वांसाठी समान असला पाहिजे," असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणाची तातडीने चौकशी करून नवी मुंबई महानगरपालिका आयुक्त व संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक ती कारवाई करण्याचे निर्देश द्यावेत तसेच केलेल्या कार्यवाहीचा अहवाल लेखी स्वरूपात द्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

## शालेय विद्यार्थ्यांना न्हावाशेवा शाखेकडून वाहतूक नियमांचे धडे

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

न्हावाशेवा वाहतूक शाखेने शाळेतील विद्यार्थ्यांना वाहतूक नियमानाबाबत प्रबोधन करून त्यांना वाहतूक नियमांची माहिती दिली. त्यामुळे विद्यार्थ्यांना भविष्यातील जबाबदार नागरिक बनण्यात मदत होणार आहे.

२१ जुलै रोजी न्हावाशेवा वाहतूक शाखा शाळा दत्तक अभियाना अंतर्गत न्हावाशेवा वाहतूक शाखा हद्दीतील साई ट्रस्ट डोंबिवली आणि जेएनपीव्ही, जेएनपीटी येथे भेट देऊन शैक्षणिक वर्ष २०२६ -२७ या वर्षातील सर्व विद्यार्थ्यांना शुभेच्छा देऊन त्या विद्यार्थ्यांना वाहतुकीच्या नियमनाबाबत प्रबोधन केले तसेच प्रबोधनाचे फलक दाखवून विद्यार्थ्यांचे प्रबोधन करण्यात आले. यावेळी ३५ ते ४० विद्यार्थी तसेच दोन शिक्षक उपस्थित होते.








**पनवेल :** केंद्र शासनाच्या स्वच्छ भारत अभियानाच्या धर्तीवर पनवेल महापालिका क्षेत्रात राबविण्यात येणाऱ्या स्वच्छ सर्वेक्षण उपक्रमांतर्गत उल्लेखनीय कामगिरीबद्दल हरिश्चंद्र शंकर भगत यांना स्वच्छतादूत पुरस्कार देऊन नुकतेच सन्मानित करण्यात आले आहे. याबद्दल माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर आणि भारतीय जनता पक्षाचे प्रदेश सचिव आमदार प्रशांत ठाकूर यांनी भगत यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यावेळी नगरसेवक सुमित झुंझारराव, के.सी. पाटील उपस्थित होते.

# नागोठणेजवळील बाळसई येथे मंदिरासह नऊ ठिकाणी चोरी

## सोन्याचे दागिने, रोकड चोरली



**नागोठणे : बातमीदार**

नागोठण्याजवळील बाळसई गावात नऊ बंद घरे आणि ग्रामदेवता बेलजाई मातेचे मंदिर फोडल्याची घटना समोर आली आहे. या घरफोडीत अज्ञात चोरट्यांनी बेलजाई मातेच्या अंगावरील साधारण दोन ग्रॅम वजनाचे सोन्याचे मणी मंगळसूत्र व नथ लंपास केली तसेच दानपेटतील सुमारे ८ ते १० हजारांची रोकडही चोरण्यात आली आहे.

यावेळी मंदिरातील बंद स्थितीत असलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची मशीनही चोरटे सोबत घेऊन गेले. त्यामुळे चोरट्यांना पकडण्याचे आव्हान नागोठणे पोलिसांसमोर उभे राहिले आहे.

मंदिरातील चोरीप्रकरणी बाळसई गावचे अध्यक्ष मधुकर ठमके यांनी नागोठणे पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. नागोठणे ग्रामीण भागातील बाळसई गावात प्रथमच झालेल्या या घरफोडीमुळे नागरिकांमध्ये घबराट निर्माण झाली आहे.

बाळसई गावात घरफोडी करताना या घरांच्या शेजारील घरांना बाहेरून कड्या लावून चोरीचा प्रयत्न करण्यात आला आहे. झालेले बहुतांश घरमालक हे कामानिमित्त मुंबई, ठाणे येथे वास्तव्यास असल्याने त्यांच्या घरातील चोरीची माहिती उपलब्ध झालेली नाही.

घरफोडी झालेल्या बंद घरांमध्ये बाळसई गावातील परंतु मुंबई येथे वास्तव्यास असलेले निवृत्त पोलीस अधिकारी भिकाजी पवार, भिकाजी जाधव, शरद जाधव, स्वप्नील पाटेकर या चार जणांचा समावेश आहे तसेच वाकण आमडोशीमार्गे रोहा रस्त्यालगत मात्र बाळसई गावाच्या हद्दीत असलेल्या तीन घर मालकांत शांताराम खांडेकर, दौलत कोकाटे, नारायण फराडे यांचा समावेश आहे. मंदिराकडे जाणाऱ्या रस्त्यालगत घरफोडी झालेल्या घर मालकांत अनंत ठमके व कृष्णा मुंडे यांचा समावेश आहे.

दरम्यान, बाळसई गावचे पोलीस पाटील पंकज कोकाटे यांना सकाळी ६ वाजण्याच्या सुमारास चोरीची घटना समजल्यानंतर त्यांनी नागोठणे पोलीस ठाण्याला सकाळी माहिती दिली. त्यानंतर नागोठणे पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी रवींद्र पारखे यांनी सहकाऱ्यांना सोबत घेऊन घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली आहे. याशिवाय फिंगर प्रिंट तज्ज्ञ व श्वान पथकानेही चोरी झालेल्या मंदिर व इतर सर्व घरांच्या ठिकाणी भेट देऊन तपास केला आहे. या प्रकरणी नागोठणे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

## खोपोली वीरेश्वर मंदिर चोरी प्रकरण

# पोलीस अधीक्षकांनी केली पाहणी



**खोपोली : प्रतिनिधी**

पेशवेकालीन वीरेश्वर मंदिरात शंकराच्या पिंडीवरील सुमारे १२ किलो वजनाचे चांदीचे आच्छादन चोरल्याच्या घटनेने खोपोली शहरात खळबळ उडाली असून नागरिकांनी पोलीस ठाण्यात निवेदन दिले आहे. मंदिरात झालेल्या चोरीच्या घटनेनंतर रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांनी घटनास्थळी भेट देत पाहणी करीत घटनेची सविस्तर माहिती घेतली आणि आरोपींचा लवकरात लवकर शोध घेण्याच्या सूचना देत तपास अधिक गतीने करण्याचे आदेश दिले आहेत.

अज्ञात चोरट्यांनी मंदिराच्या मागील लोखंडी दरवाजाचे कुलप तोडून प्रवेश करून भगवान शंकराच्या पिंडीवरील सुमारे १२ किलो वजनाचे अंदाजे २० लाख रुपये किमतीचे चांदीचे आच्छादन चोरल्याची घटना १९ जुलै रोजी पहाटे २.३० वाजण्याच्या सुमारास घडली. मंदिरातील चोरीबरोबर बाजारपेठेतील दोन पान टपऱ्याही चोरट्यांनी फोडल्या आहेत.

यानंतर खोपोली पोलिसांनी तपाचे चक्र फिरवत तांत्रिक विश्लेषक आणि गुप्तचर यंत्रणेच्या मदतीने तपास सुरू केला आहे. तपास अधिक गतीने करण्याचे आदेश रायगड पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांनी दिले आहेत. त्यांनी घटनास्थळी पाहणी केल्यानंतर स्थानिक नागरिक आणि मंदिर समितीच्या पदाधिकाऱ्यांशीही चर्चा करून आवश्यक ती कारवाई करण्याचे आश्वासन दिले.

यावेळी श्री वीरेश्वर ग्रामस्थ मंडळाचे अध्यक्ष विकास जोशी, सल्लागार दत्तात्रेय मसुरकर, मनेश यादव, नितीन जोशी, संतोष गायकर तसेच संजय जाधव, सचिन येवले, मयुर रेटरेकर, तेजस कांबळे, सचिन येवले, संदेश येवले, दिनेश गुरव यांच्यासह श्री वीरेश्वर ग्रामस्थ मंडळाचे सदस्य आणि नागरिक उपस्थित होते.

# एसआयआर : ६५.९५ टक्के मतदारांची यशस्वी जोडणी

**अलिबाग : प्रतिनिधी**

विशेष सखोल मतदार पुनरीक्षण (एसआयआर) मोहिमेत रायगड जिल्ह्यात २५ लाख ३३ हजार ७३९ मतदार आहेत. यातील ६५.९५ टक्के मतदारांची २००२च्या मतदार यादीशी यशस्वीपणे जोडणी झाली आहे. ३५ टक्के मतदारांची जोडणी शिल्लक आहे, तर १५ टक्के मतदारांच्या जोडणीत काही त्रुटी आढळून आल्या आहेत.

केंद्रीय निवडणूक आयोगाने एसआयआर कार्यक्रम जाहीर केला आहे. या कार्यक्रम अंतर्गत ३० जूनपासून मतदान केंद्र स्तरावरील अधिकारी (बीएलओ) मतदारांच्या पात्रतेची सखोल तपासणी करण्यासाठी घरभेटी देणार आहेत. २००२च्या मतदार यादीशी जोडणी करून मतदारांची पडताळणी केली जाणार आहे. यात अपात्र आढळून येणाऱ्या मतदारांची नावे वगळली जाणार आहेत.

जिल्ह्यात २५ लाख ३३ हजार ७३९ मतदार आहेत. यातील ६५.९५ टक्के मतदारांची २००२च्या मतदार यादीशी यशस्वीपणे जोडणी झाली आहे. ३५ टक्के मतदारांची जोडणी शिल्लक आहे. १५ टक्के मतदारांच्या जोडणीत काही त्रुटी आढळून आल्या आहेत. या सर्व मतदारांची पडताळणी सुरू आहे. मतदारांकडून अथवा त्यांच्या कुटुंबीयांकडून गणना प्रपत्र भरून घेतले जात आहे.

यासाठी केंद्रस्तरीय अधिकारी आणि कर्मचारी मतदारांच्या घरी येणे अपेक्षित आहे, पण अनेक ठिकाणी अधिकारी आणि कर्मचारी मतदारांच्या घरी जाण्याऐवजी मतदान केंद्रावर अथवा सार्वजनिक ठिकाणी बसून मतदारांना कागदपत्र घेऊन पडताळणीसाठी बोलवत आहेत. त्यामुळे मतदारांमध्ये नाराजी आहे. पडताळणीची मुदत संपत आली तरी अनेक ठिकाणी मतदान केंद्रस्तरीय अधिकारी घरभेटीवर फिरकलेच नसल्याच्या तक्रारी होत आहेत.

**सर्व केंद्र स्तरीय मतदान अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी किमान एकदा तरी मतदारांच्या घरी भेट देणे आवश्यक आहे. तसे निर्देश प्रशासनाने दिले आहेत.**

**–नितीन वाघमारे, उपजिल्हा निवडणूक अधिकारी, रायगड**

# गोरगरीबांना आरोग्य सेवांचा आधार मिळावा –सभापती वैकुंठ पाटील

## ■ जिते येथे शिबिर ; ग्रामस्थांचा लाभला उत्स्फूर्त प्रतिसाद



**पेण : प्रतिनिधी**

गोरगरीब जनतेला एक आधार मिळावा या मुख्य हेतूने आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आल्याचे रायगड जिल्हा परिषदेचे कृषी व पशुसंवर्धन समिती सभापती वैकुंठ पाटील यांनी बोलताना सांगितले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित संपूर्ण राज्यात मुख्यमंत्री जनआरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले असून पेण तालुक्यात १० ठिकाणी या जनआरोग्य शिबिराचा लाभ जनतेला मिळत आहे. या अनुषंगाने सोमवारी जिते येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी सभापती पाटील बोलत होते.

जिते प्राथमिक आरोग्य केंद्रात जिल्हा परिषदेच्या माध्यमातून दुरूस्तीचे काम करण्यात आले आहे तसेच येथे सुसज्ज इमारत आणि आधुनिक उपकरणांसाठी प्रयत्न करण्यात येत असल्याचे यावेळी पाटील यांनी सांगितले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून भारतीय जनता पक्षाकडून जनआरोग्य शिबिर राबवण्यात येत आहे या शिबिराचा सर्व ग्रामस्थांनी लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा परिषदेचे अध्यक्ष मंगेश वाकडीकर यांनी केले.

या शिबिरास पंचायत समिती सभापती स्मिता पाटील, माजी सरपंच वासुदेव म्हात्रे, नवनाथ म्हात्रे, उपसरपंच सागर म्हात्रे, सदस्य किसन पाटील, सदस्य निलेश तांडेल, लीलाधर म्हात्रे, संजय घरत तसेच तालुका वैद्यकीय अधिकारी सुनील नखाते, डॉ. अपर्णा माळवे, डॉ. आयुष, आरोग्य सहाय्यक राजेश म्हात्रे, गायत्री कारकर, उदय म्हात्रे, संतोष म्हात्रे, आरोग्य सेवक, सेविका, आशा सेविका यांच्यासह मोठ्या संख्येत लाभार्थी ग्रामस्थ उपस्थित होते.

या शिबिरात ६० वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांच्या आरोग्याची तपासणी करण्यात आली. ग्रामस्थांचा शिबिराला उत्स्फूर्त प्रसाद लाभला.

पूरपरिस्थितीमध्ये काम करणारे, दादर, जिते, बळवली, प्राथमिक आरोग्य केंद्रातील कर्मचारी, आशा सेविका यांचा यावेळी सत्कार करण्यात आला.

# नगराध्यक्ष चंद्रकांत चौधरी यांच्याकडून छत्र्यांचे वाटप



**माथेरान : प्रतिनिधी**

माथेरान नगरीचे नगराध्यक्ष चंद्रकांत चौधरी यांनी गतवर्षीप्रमाणे यंदाही सर्व माथेरानवासीयांना छत्र्यांचे वाटप केले. माथेरान मुख्य बाजारपेठेतील श्रीराम चौकात हा कार्यक्रम घेण्यात आला.

नगराध्यक्ष चौधरी हे माथेरानमधील नागरिकांसाठी विविध समाजोपयोगी कार्यक्रम नेहमीच राबवित असतात. अनेक गरजवंतांना ते सढळ हस्ते येथे मदत करीत असतात. त्यांनी स्वखर्चाने अनेक सेवाभावी उपक्रम राबविले आहेत. यावर्षीदेखील त्यांनी माथेरानवासीयांना छत्री वाटप केले. यावेळी त्यांचे सहकारी नगरसेवक तसेच पक्षाचे पदाधिकारी व नागरिक उपस्थित होते.

# पळस येथे वृक्षारोपण आणि विद्यार्थ्यांना खाऊवाटप



**नागोठणे : बातमीदार**

लायन्स क्लब नागोठणेच्या माध्यमातून आदर्श नागरी सहकारी पतसंस्था तसेच पीएनपी माध्यमिक विद्यालय, पळस यांच्या संयुक्त विद्यमाने वृक्षारोपण आणि विद्यार्थ्यांना खाऊ वाटप कार्यक्रम घेण्यात आला. विशेष म्हणजे, यावेळी विद्यार्थ्यांनी मान्यवरांच्या स्वागतासाठी बाजारातील पुष्पगुच्छ न आणता झाडांच्या पानांपासून आकर्षक पुष्पगुच्छ स्वतः तयार केले.

लायन्स क्लब नागोठणेचे अध्यक्ष विलास चौलकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमास उपाध्यक्ष सुधाकर जवके, विवेक सुभेकर, यशवंत चित्रे, विजय शहासने, संतोष शहासने, अनुराधा शहासने, आदर्श पतसंस्थेच्या नागोठणे शाखेच्या व्यवस्थापिका पूर्वा वैद्य, आदिती पाटील, नागोठणे केंद्र प्रमुख सुनील मोंढे, पीएनपी माध्यमिक विद्यालयाचे स्थानिक शाळा समिती अध्यक्ष गजानन भोईर, माजी अध्यक्ष गणपत डाकी, मुख्याध्यापक लक्ष्मण मोकल, शिक्षिका सायली ठाकूर, समीक्षा यादव, प्रेरणा शेळके यांच्यासह विद्यार्थी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना विलास चौलकर म्हणाले, वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरे ही संत तुकाराम महाराजांची शिकवण आजही तितकीच महत्त्वाची आहे. प्रत्येकाने आपल्या आईच्या नावाने किमान एक झाड लावून त्याचे संगोपन करावे. आईची जशी सेवा करतो, तशीच झाडांचीही सेवा केली, तर पर्यावरण संवर्धनाची मोठी चळवळ उभी राहू शकते.

पूर्वा वैद्य यांनी सांगितले की, संस्थेने रायगड जिल्ह्यात सहा हजार झाडे लावण्याचा संकल्प केला असून नागोठणे परिसरात आतापर्यंत ३२५ झाडांची लागवड करण्यात आली आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षिका प्रेरणा शेळके यांनी केले, तर उपस्थितांचे आभार शिक्षिका सायली ठाकूर यांनी मानले.

# पंढरपूरसाठी विशेष रेल्वेगाड्या

**रोहा : प्रतिनिधी**

मध्य रेल्वेद्वारे २२ ते २९ जुलै या कालावधीत पंढरपूर येथे आषाढी यात्रेसाठी जाणाऱ्या भाविकांच्या सोयीसाठी पंढरपूर आणि दादरदरम्यान दोन आषाढी विशेष गाड्या चालविण्यात येणार आहेत.

दादर–पंढरपूर–दादर विशेष गाडी क्रमांक ०१०४५ २४ जुलै २०२६ रोजी १२.५० वाजता दादर येथून सुटेल आणि त्याच दिवशी ९.१५ वाजता पंढरपूर येथे पोहचेल; तर विशेष गाडी क्रमांक ०१०४६ ही २६ जुलै रोजी १२.१५ वाजता पंढरपूर येथून सुटेल आणि त्याच दिवशी ११.४५ वाजता दादर येथे पोहचेल. या गाडीला ठाणे, कल्याण, लोणावळा, पुणे, दौंड आणि कुर्डुवाडी हे थांबे देण्यात आले आहेत.

या गाडीची संरचना दोन वातानुकूलित तृतीय, १० शयनयान, चार सामान्य द्वितीय श्रेणी आणि दोन द्वितीय आसनासह गार्ड्स ब्रेक व्हॅन अशी आहे. आषाढी विशेष गाडी क्रमांक ०१०४५ आणि गाडी क्रमांक ०१०४६साठी आरक्षण सर्व संगणकीकृत आरक्षण केंद्रांवर आणि www.irctc.co.in या संकेतस्थळावर सुरू झाले आहे.

आषाढी यात्रेदरम्यान प्रवाशांची अतिरिक्त गर्दी लक्षात घेऊन आवश्यकतेनुसार अतिरिक्त विशेष गाड्याही चालविण्यात येतील. प्रवासी तिकीट आरक्षणासाठी 'रेलवन' ॲपदेखील डाउनलोड करू शकतात.या विशेष गाड्यांच्या थांब्यांवरील सविस्तर वेळेसाठी www.enquiry.indianrail.gov.in ला भेट द्या किंवा एनटीइएस ॲप डाउनलोड करा, असे आवाहन मध्य रेल्वे प्रशासनाने केले आहे.

# आषाढी एकादशीनिमित्त अलिबागमध्ये ‘अभंगवाणी’

**अलिबाग : प्रतिनिधी**

आषाढी एकादशीचे औचित्य साधून अलिबाग येथील श्रीकृपा प्रतिष्ठानच्या वतीने अभंगवाणी या भक्तिसंगीताच्या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. २५ जुलै रोजी सायंकाळी ६ वाजता अलिबाग येथील पीएनपी नाट्यगृहात हा कार्यक्रम होणार असून सर्व रसिकांसाठी तो विनामूल्य खुला असल्याची माहिती प्रतिष्ठानचे अध्यक्ष ॲड. संतोष पवार यांनी दिली.

वारकरी संप्रदायाची परंपरा, संतवाङ्मय आणि अभंगांच्या माध्यमातून भक्तिरसाची अनुभूती देणाऱ्या या कार्यक्रमात ज्येष्ठ शास्त्रीय गायक पं. धनंजय जोशी आणि शास्त्रीय गायिका कस्तुरी देशपांडे–मांजरेकर अभंग व भक्तिगीतांचा सुरेल नजराणा सादर करणार आहेत. श्रीराम ठोसर निरूपण करणार असून आदित्य पानवलकर (तबला), निनाद जोशी (संवादिनी), सूरज गोंधळी (पखवाज), प्रणव दांडेकर (तालवाद्य) आणि तेजस गोविलकर (बासरी) हे कलाकार साथसंगत करतील.

नागरिकांनी व रसिकांनी उपस्थित राहून या भक्तिसंगीताच्या पर्वाचा लाभ घ्यावा तसेच अधिक माहितीसाठी सुनील दामले (९९७००५०५३३) किंवा भालचंद्र देशपांडे (८८८८५०००२५) यांच्याशी संपर्क साधावा.

## ऐश्वर्या कलवार बी.आर्च परीक्षा पास

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जतमधील ऐश्वर्या राजेश कलवार हिने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अंतिम वर्ष बी.आर्च परीक्षेत उल्लेखनीय कामगिरी केली आहे. आर्किटेक्चरमध्ये ८.७६ सीजीपीएसह तिने विशेष प्रावीण्य मिळवले.



ऐश्वर्या ही नाशिक येथील कॉलेजची विद्यार्थिनी असून तिने अंतिम वर्षातील ३८पैकी ३८ क्रेडिट्स पूर्ण करत एकूण सर्व १५३ क्रेडिट्स संपादन केले तसेच एकूण १३४० क्रेडिट पॉइंट्स मिळवत तिने सातत्यपूर्ण शैक्षणिक गुणवत्ता सिद्ध केली आहे. या यशाबद्दल तिचे अभिनंदन होत आहे.

# चंपावती पतसंस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा



**रेवदंडा : प्रतिनिधी**

रेवदंडा येथील चंपावती ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेची ३०वी वार्षिक सर्वसाधारण सभा चौल सागमळा येथील पाठारे क्षत्रीय समाज हॉलमध्ये उत्साहात झाली. यावेळी विविध विषयांवर विचारविनिमय करण्यात आला.

संस्थेचे अध्यक्ष विश्वास जोशी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या सभेस उपाध्यक्ष प्रसाद आठवले, सचिव उल्हास तुरकर, संचालक अरविंद मनोहर, दिलीप पटेल, विलास धाटावकर, शामल पराड, अभय मोडक, संजय ठाकूर, बिना पटेल, स्नेहा जोशी, तज्ज्ञ संचालक पांडुरंग मोहिते, डॉ. केदार ओक, मुख्य कार्यकारी अधिकारी विजय दशरथ मानकर आदींसह सभासद उपस्थित होते.

प्रारंभी सभासदांसाठी सहकार प्रशिक्षण केंद्राचे प्रा. एस.बी. वाटाणे यांचे प्रशिक्षण तसेच उपस्थित सभासदांना मार्गदर्शन करण्यात आले. त्यानंतर दिवंगतांना श्रद्धांजली अर्पण करून उपस्थितांचे स्वागत व प्रास्ताविक सीईओ विजय मानकर यांनी केले. यानंतर गुणवंतांचा सत्कार झाला.

या सभेत मागील सभेचे इतिवृत्त वाचन, या वर्षाचा अहवाल, ताळेबंद, नफातोटा पत्रक वाचन व मान्यता देणे, वैधानिक लेखा परीक्षण अहवालाचा विचार करणे तसेच मान्यता देणे, वैधानिक लेखा परीक्षकांच्या दोषदुरूस्ती अहवालाची नोंद घेणे, आर्थिक वर्षाच्या वैधानिक लेखा परीक्षणाकरिता पॅनेलवरील लेखा परीक्षकांची नेमणूक करणे व त्याच्या मानधनास मान्यता देणे, अंदाजपत्रकास मंजुरी देणे, अंदाज पत्रकातील कमी अधिक झालेल्या खर्चाची माहिती देणे, संचालक मंडळ व नातेवाईक यांच्या कर्जाची माहिती देणे, उपविधी स्वीकारण्यास मंजुरी देणे, पोटनियम दुरूस्ती मान्यता देणे, शाखा विस्तारास मान्यता देणे आदी कामे घेण्यात आली.

# कुस्तीमहर्षी रायगड केसरी स्पर्धा उत्साहात

## जयेश खरमारे विजेता, दिवेश पालांडेला उपविजेतपद





**खोपोली, चौक : प्रतिनिधी**

कुस्तीमहर्षी भाऊसाहेब कुंभार यांच्या जयंतीनिमित्त खोपोली येथील कुस्तीमहर्षी भाऊसाहेब कुंभार कुस्ती न्यासाच्या वतीने आयोजित कुस्तीमहर्षी रायगड केसरी २०२६ ही भव्य जिल्हास्तरीय कुस्ती स्पर्धा काशी स्पोर्ट्स क्लब या ठिकाणी उत्साहपूर्ण आणि जल्लोषमय वातावरणात पार पडली. दिवसभर रंगलेल्या चुरशीच्या कुस्त्यांनी हजारो कुस्तीप्रेमींना खिळवून ठेवले.

रायगड जिल्ह्याच्या विविध तालुक्यांतील शेकडो मल्लांनी स्पर्धेत सहभाग घेत आपल्या दमदार खेळाचे प्रदर्शन केले. वरिष्ठ पुरुष, महिला तसेच १६ वर्षांखालील मुला-मुलींच्या विविध वजन गटांतील सामने अत्यंत रंगतदार झाले. सोहेल शेख, क्षितिजा मरागजे, काव्या मरागजे, ओमकार निंबळे यांच्या कुस्त्या प्रेक्षणीय झाल्या.

स्पर्धेतील प्रतिष्ठेच्या रायगड केसरी किताबासाठी झालेल्या अंतिम लढतीत जयेश अरुण खरमारे (खालापूर) याने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत रायगड केसरी हा मानाचा किताब पटकावला, तर दिवेश दत्तात्रय पालांडे (खालापूर) उपविजेता ठरला. विजेता आणि उपविजेत्या मल्लांना मानाची गदा, रोख पारितोषिक, पदक व प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आला. यामध्ये पुरुष विभागातील विजेत्यास कुस्तीमहर्षी भाऊसाहेब कुंभार यांच्या स्मरणार्थ मानाची गदा, तर महिला विभागातील विजेत्यास स्व. किसनमामा शेलार यांच्या स्मरणार्थ मानाची गदा प्रदान करण्यात आली.

स्पर्धेस रायगड जिल्हा कुस्तीगीर संघटनेचे अध्यक्ष तथा पनवेल महापालिकेचे नगरसेवक परेश ठाकूर, खालापूर तालुका पंचायत समितीचे सभापती कृष्णा पारंगे, रायगड जिल्हा परिषद सदस्य संतोष बैलमारे, खोपोलीचे नगराध्यक्ष कुलदीपक शेंडे, उपनगराध्यक्ष विक्रम साबळे, खालापूर तालुका पंचायत समितीचे सदस्य रघुनाथ उर्फ भाई शिंदे, नगरसेविका प्रतीक्षा रेटरेकर, सानिया शेख, सामाजिक कार्यकर्ते सिद्धांत शेलार, विठ्ठल मोरे, किशोर ओसवाल, दिलीप म्हसे, किशोर शिंदे, अॅड. जयेश तावडे, तानाजी चव्हाण, महेंद्र सावंत यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवरांची उपस्थिती लाभली.

उपस्थित मान्यवरांनी कुस्तीमहर्षी भाऊसाहेब कुंभार यांच्या कार्याचा गौरव करत रायगड जिल्ह्यातील कुस्ती परंपरा अधिक समृद्ध करण्यासाठी अशा स्पर्धा सातत्याने आयोजित होणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले.

स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी कुस्तीमहर्षी भाऊसाहेब कुंभार कुस्ती न्यासाचे अध्यक्ष राजाराम कुंभार, सचिव जगदीश मरगजे तसेच सर्व पदाधिकारी, पंच, प्रशिक्षक, स्वयंसेवक, हेल्प फाउंडेशनचे सदस्य आणि कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

# तळ्याची जिम्नॅस्ट चार्वी कोलवणकरने आंतरराष्ट्रीय स्तरावर फडकवला तिरंगा

## चीनमध्ये चार सुवर्णपदकांची मानकरी

**तळा : प्रतिनिधी**

तळा शहरातील जिम्नॅस्ट चार्वी अभिजित कोलवणकर हिने चीनमधील शांघाय येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय निमंत्रित जिम्नॅस्टिक्स स्पर्धेत तिच्या वयोगटातील चारही प्रकारांमध्ये सुवर्णपदक पटकावून विक्रम केला आहे. तिच्या या कामगिरीमुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताचा तिरंगा अभिमानाने फडकला आहे.



यापूर्वी चार्वी कोळवणकर हिने अवघ्या सहा वर्षाची असताना सिंगल पूल अप बारवर सर्वात जास्त वेळ लटकण्याचा विक्रम केला होता व तिच्या या कामगिरीची इंडियन बुक ऑफ रेकॉर्डमध्ये नोंद करण्यात आली होती. त्यानंतर इन्फिनिटी जिम्नॅस्टिक क्लब (पुणे) येथे पार पडलेल्या जिल्हास्तरीय जिम्नॅस्टिक स्पर्धेत नेत्रदीपक कामगिरी करत तिने व्हॉल्ट उपकरण स्पर्धेत सुवर्णपदक जिंकले होते.

यशाची परंपरा कायम राखत चीनमधील शांघाय येथे आयोजित एशियन गेम्समध्ये जिम्नॅस्टिक्सच्या आर्टिस्टिक या क्रीडा प्रकारात आठ देशांतील ७१५ स्पर्धकांमधून चार्वी हिने आपल्या अप्रतिम कौशल्याची चुणूक दाखवून सुवर्णपदके मिळवली आहेत. त्यात असमान दांडे, घोडा उडी, तुळई आणि जमिनीवरील व्याम या चारही प्रकारात सोनेरी कामगिरी करीत ऑलराउन्ड चॅम्पियन म्हणूनही सुवर्णपदक मिळवले आहे.

चार्वीने लहानपणापासूनच जिद्द, चिकाटी आणि सातत्यपूर्ण सरावाच्या जोरावर यशाचा चढता आलेख कायम राखला आहे. यासाठी तिला मार्गदर्शक प्रशिक्षक, आई-वडील यांचे प्रोत्साहन व मार्गदर्शन नियमित मिळते. ताज्या यशाबद्दल तिचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# स्पेन संघाचे मायदेशी जंगी स्वागत; २० लाख नागरिकांची उपस्थिती

**माद्रिद : वृत्तसंस्था**

न्यू जर्सी येथे पार पडलेल्या रोमांचक अंतिम सामन्यात अर्जेंटिनाचा १-० अशा गोलने पराभव करत विश्वचषक पटकावणारा स्पेनचा फुटबॉल संघ सोमवारी उत्साहात आपल्या मायदेशी परतला. स्पॅनिश राजधानी माद्रिदच्या रस्त्यांवर विश्वविजेत्या संघाचे स्वागत करण्यासाठी तब्बल २० लाख नागरिकांची अभूतपूर्व गर्दी जमली होती.



राजधानीत दाखल झाल्यानंतर २६ खेळाडू आणि त्यांच्या प्रशिक्षण पथकाने देशाच्या राजघराण्यातील सदस्यांची भेट घेतली. त्यानंतर त्यांनी देशाचे पंतप्रधान पेड्रो सांचेझ यांची भेट घेतली. यावेळी कौतुक करताना पंतप्रधान सांचेझ म्हणाले, तुमच्या खेळाच्या शैलीबद्दल, कष्टाबद्दल आणि या ऐतिहासिक विजयाबद्दल प्रशिक्षक आणि खेळाडूंचे मनापासून आभार. तुमचा खेळ पाहताना आम्हाला असीम आनंद झाला.

पंतप्रधानांच्या भेटीनंतर संघ एका विशेष उघड्या छताच्या बसमधून मध्य माद्रिदमधून मिरवणुकीसाठी निघाला. बसवर "तारे एकत्र चमकतात" अशी ओळ आणि फुटबॉलपटूंचे आकर्षक फोटो लावण्यात आले होते. हातात विश्वचषक ट्रॉफी घेऊन आणि 'सोमोस कॅम्पिओनेस' (आम्ही चॅम्पियन्स आहोत) असे लिहिलेली जर्सी परिधान केलेल्या खेळाडूंनी रस्त्यावरील चाहत्यांसोबत नृत्य करत आनंद साजरा केला.

या ऐतिहासिक क्षणी भावना व्यक्त करताना स्पेनचे प्रशिक्षक लुईस दे ला फुएंते म्हणाले, इतक्या उत्कट आणि समर्पित चाहत्यांसह एका अद्भुत देशाचे प्रतिनिधित्व करणे हा एक अत्यंत भावनिक आणि अभिमानाचा क्षण आहे. आमचे संपूर्ण पथक या प्रेमाने भारावून गेले आहे.

# पराभवानंतर मेस्सीची भावनिक पोस्ट

**ब्युनोस आयर्स : वृत्तसंस्था**

फिफा वर्ल्डकप स्पर्धेत अवधा एक गोल गमावलेल्या स्पेनचा अभेद्य बचाव लिओनेल मेस्सीलाही भेदता न आल्यामुळे सलग दुसरा विश्वचषक जिंकण्याचे अर्जेंटिनाचे स्वप्न अंतिम टप्प्यावर येऊन भंगले. या पराभवानंतर मेस्सीने इन्स्टाग्रामवर भावनिक पोस्ट केली.

मेस्सीने आपल्या पोस्टमध्ये म्हटले आहे की, वेदना अथांग आहे आणि ही जखम भरायला वेळ लागेल, मात्र या प्रवासातील सर्व चांगल्या आठवणी जपून ठेवण्याचा मी निर्णय घेतला आहे. सर्वस्व पणाला लावून आम्ही जिंकलेले सामने आणि आयुष्यभर स्मरणात राहतील असे क्षण मी कायम जपून ठेवेन. संपूर्ण देशाने दिलेला पाठिंबा मी कधीही विसरणार नाही. संघातील प्रत्येक खेळाडूच्या मेहनतीमुळे आणि अथक प्रयत्नांमुळे अर्जेंटिनाने पुन्हा एकदा जगातील सर्वोत्तम संघांमध्ये आपले स्थान निर्माण केले. आज आम्ही जे काही साध्य केले आहे, त्याचे कौतुक करणेही कठीण आहे. या संघाने सलग दोन विश्वचषकांच्या अंतिम फेरीत धडक मारली हीच मोठी कामगिरी आहे. प्रत्येक शुभेच्छा आणि संदेशाबद्दल मनापासून धन्यवाद!

# पावसाळ्यात रबरी बॉल क्रिकेट सामन्यांची रंगत; युवकांमध्ये उत्साह

**माणगाव : प्रतिनिधी**

पावसाळा म्हटला की शेतीची कामे, हिरवागार निसर्ग आणि धबधब्यांची भटकंती अशीच सर्वसाधारण कल्पना केली जाते, पण रायगड जिल्ह्यात या दिवसांत एक वेगळेच चित्र पाहायला मिळत आहे. मुसळधार पाऊस, चिखलाने भरलेली मैदाने आणि अंगावर कोसळणाऱ्या सरी यांची पर्वा न करता विविध गावांमध्ये रबरी बॉल क्रिकेट स्पर्धा मोठ्या उत्साहात सुरू असून या स्पर्धांना खेळाडूंसह ग्रामस्थांकडूनही उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

साधारणपणे टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धा उन्हाळा किंवा हिवाळ्यात आयोजित केल्या जातात. माणगाव तालुक्यातील क्रिकेटप्रेमींनी पावसाळ्यातही क्रिकेटचा उत्सव सुरू ठेवला आहे. गावागावात संघांची चुरशीची लढत रंगत असून,मैदानावर खेळाडूंच्या उत्साहाला पावसाचाही अडथळा ठरत नाही.



अनेक जण पावसाळ्यात पर्यटनासाठी किंवा घरात वेळ घालविणे पसंत करतात, मात्र माणगाव तालुक्यातील युवकांनी क्रिकेटलाच आपला आनंदाचा उत्सव बनवला आहे. संपूर्ण शरीर चिंब भिजलेले, कपडे चिखलाने माखलेले, हात-पाय थकलेले असले तरी खेळाविषयीची त्यांची निष्ठा आणि जिद्द कमी होत नाही.

**खेळाडूंचा लागतोय कस!**

पावसाळ्यात क्रिकेट खेळणे हे सोपे काम नाही. मैदानावर चिखल, पाणी साचलेले असते. धावताना घसरण्याचा, दुखापत होण्याचा धोका असतो. ही सर्व आव्हान स्वीकारत युवक जोमाने मैदानात उतरतात. फलंदाजी, गोलंदाजी आणि क्षेत्ररक्षण करताना उभे राहण्याची जिद्द आणि विजयासाठीचा संघर्ष हे दृश्य उपस्थितांच्या अंगावर रोमांच उभे करणारे ठरत आहे.

उलट प्रत्येक षटकागणिक मैदानावरील उत्साह आणखी वाढताना दिसतो.

या स्पर्धा केवळ मनोरंजनापुरत्या मर्यादित नसून ग्रामीण भागातील तरुणांमध्ये शारीरिक तंदुरुस्ती, सांघिक भावना, नेतृत्वगुण, शिस्त आणि क्रीडासंस्कृती रुजविण्याचे महत्त्वपूर्ण कार्यही करत आहेत.

# भारताविरुद्ध टी-२० मालिकेसाठी झिम्बाब्वे सज्ज

## चुरशीची लढत देऊ -कर्णधार सिकंदर रझा

**हरारे : वृत्तसंस्था**

भारत आणि झिम्बाब्वे यांच्यात येत्या गुरुवार (दि.२३)पासून तीन सामन्यांची टी-२० मालिका खेळली जाणार आहे. या मालिकेआधी झिम्बाब्वेचा कर्णधार सिकंदर रझाने ही मालिका एकतर्फी नसेल, असा विश्वास व्यक्त केला.

भारत आणि झिम्बाब्वे यांच्यातील टी-२० मालिकेआधी सिकंदर रझाने स्टार स्पोर्ट्सशी बोलताना म्हटले की, या मालिकेत कुठलाही संघ वरचढ नसेल. दोन्ही संघ सध्या वेगवेगळ्या टप्प्यातून जात आहेत. झिम्बाब्वे सातत्याने चांगले क्रिकेट खेळत आहेत. दोन्ही संघाकडे आपली क्षमता सिद्ध करण्याची संधी असेल. त्यामुळे ही मालिका अत्यंत रोमांचक आणि चुरशीची ठरेल.

भारतीय संघ यापूर्वीच्या आयरलँड आणि इंग्लंड दौऱ्यातील निराशाजनक कामगिरीनंतर पुनरागमन करण्याचा प्रयत्न करेल. बेलफास्टमध्ये झालेल्या दोन टी-२० सामन्यांच्या मालिकेत भारताचा ०-२ असा पराभव झाला. इंग्लंड दौऱ्यात श्रेयस अय्यरच्या नेतृत्वाखाली पाच टी-२० सामन्यांच्या मालिकेत टीम इंडियाला ०-४ असा पराभव पत्करावा लागला. त्यानंतर शुबमन गिलच्या नेतृत्वाखाली टीम इंडियाला एकदिवसीय मालिकाही १-२च्या फरकाने गमावली.

दुसरीकडे झिम्बाब्वेचा संघ सध्या चांगला आणि मनोरंजक क्रिकेट खेळत आहे. टी-२० विश्वचषकातील सामन्यात झिम्बाब्वेने कोलंबो येथे ऑस्ट्रेलियाला २३ धावांनी हरवून मोठा उलटफेर केला होता, ज्यामुळे ऑस्ट्रेलिया ग्रुप स्टेजमधूनच बाहेर पडला होता. याशिवाय जिम्बाब्वेने यंदा श्रीलंका आणि बांगलादेश यांसारख्या बलाढ्य संघांनाही पराभूत केले आहे.






# ऋतुराज गायकवाड दुलीप ट्रॉफीमध्ये करणार नेतृत्व : पश्चिम विभाग संघाची धुरा

**पुणे : प्रतिनिधी**

टीम इंडियाचा फलंदाज आणि चेन्नई सुपर किंग्सचा कर्णधार ऋतुराज गायकवाड हा देशांतर्गत क्रिकेटमधील दुलीप ट्रॉफी स्पर्धेत पश्चिम विभाग संघाचे नेतृत्व करताना दिसणार आहे. २३ ऑगस्टपासून बंगळुरू येथील बीसीसीआयच्या सेंटर ऑफ एक्सलन्समध्ये रंगणाऱ्या या स्पर्धेसाठी मुंबईचा अष्टपैलू शम्स मुलानी याच्याकडे उपकर्णधारपदाची जबाबदारी सोपवली आहे.



मुंबईचे मुख्य निवडकर्ता राजेश पवार यांच्या अध्यक्षतेखालील निवड समितीने सोमवारी १५ सदस्यीय संघाची घोषणा केली. दुलीप ट्रॉफीच्या क्वार्टर फायनल २मध्ये पश्चिम विभाग विरुद्ध उत्तर विभाग यांच्यातील सामना २३ ते २६ ऑगस्टदरम्यान होणार आहे. स्पर्धेत एकूण पाच सामने खेळवले जाणार असून अंतिम सामना ६ ते १० सप्टेंबरदरम्यान होईल.

ऋतुराज गायकवाड गेल्या काही काळापासून भारतीय संघाबाहेर आहे. इंग्लंड दौऱ्यासाठी त्याची ना टी-२० संघात निवड झाली, ना वनडे मालिकेसाठी, मात्र, इंडिया ए, श्रीलंका ए आणि अफगाणिस्तान ए यांच्यात झालेल्या लिस्ट-ए तिरंगी मालिकेत त्याला संधी मिळाली होती आणि त्याने तेथे चांगली कामगिरी केली होती. देशांतर्गत क्रिकेटमध्ये ऋतुराजची कामगिरी सातत्यपूर्ण आणि प्रभावी राहिली आहे. त्याने अनेक वेळा संघासाठी सामनाविजयी खेळी केल्या आहेत.

गेल्या वर्षी मुंबईचा संघ सोडून महाराष्ट्राकडून खेळण्याचा निर्णय घेतलेला पृथ्वी शॉचादेखील या संघात समावेश करण्यात आला आहे तसेच सरफराज खान आणि मुशीर खान यांनाही संधी देण्यात आली आहे.

संघ : ऋतुराज गायकवाड (कर्णधार, महाराष्ट्र), शम्स मुलानी (उपकर्णधार, मुंबई), पृथ्वी शॉ (महाराष्ट्र), हार्विक देसाई (यष्टिरक्षक, सौराष्ट्र), उर्विल पटेल (यष्टिरक्षक, गुजरात), शिवालिक शर्मा (बडोदा), मुशीर खान (मुंबई),सरफराज खान (मुंबई), जयमीत पटेल (गुजरात), सिद्धार्थ देसाई (गुजरात), तनुष कोटियन (मुंबई), तुषार देशपांडे (मुंबई), शार्दुल ठाकूर (मुंबई), अतित सेठ (बडोदा), मुकेश चौधरी (महाराष्ट्र).






दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com